
परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष ११, अंक ६. फेब्रुवारी–मार्च २०१८




१) आले, प्रभु आले, भारत भूमिवरी... (संपादकीय) २
२) जेव्हा शिवबाबा हसवतात... ५
३) नम्र विनंती ही सर्वांना (कविता) ८
४) परमपिता शिव भगवान (कविता) ८
५) समस्त धर्मियांना मान्य होईल असा परमपिता परमात्म्याच्या हृदयस्पर्शी परिचय (भाग १) ९
६) ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... १३
७) राजयोग व संकल्प शक्तीचा जल प्रयोग १६
८) सचित्र सेवावृत्त १८
९) अंतर्मुखी सदासुखी २०
१०) आत्मा, परमात्मा, ड्रामा व प्रकृत्ती अनादि अनंत (भाग २) २३
११) सकारात्मक चिंतन हाच स्वउन्नतीचा आधार २६
१२) आरोग्यम् धनसंपदा २८
१३) शिवजयंती! अजन्माचा वाढदिवस!! (अनुभव) ३०
१४) शंखध्वनी ३३
१५) जीवनाला 'यू टर्न' दिला शिवबाबांनी (अनुभव) ३५


### मुखपृष्ठाविषयी

शिव मंदिरात शिवलिंगावर बेलपत्र वाहायची प्रथा फार जुनी आहे. त्या परंपरेनुसार शिवभक्त मोठ्या भक्तिभावाने शिवलिंगावर बेल वाहत असतात. तथापि शिवलिंगावर बेलच का वाहायचा, याचे आध्यात्मिक रहस्य मात्र भक्तगण जाणत नाहीत. ते पुढीलप्रमाणे आहे.

बेलपत्राला असलेली तीन पाने ही ब्रह्मा, विष्णु व शंकर या तीन देवतांचे प्रतीक आहे. व त्या तीन देवांचा रचयिता जो परमात्मा शिव आहे त्याचे प्रतीक मुख्य देठ आहे. शिव परमात्मा ब्रह्माद्वारे नव सृष्टीची स्थापना, शंकराद्वारे जुन्या सृष्टीचा महाभारी विनाश व विष्णुद्वारे स्वर्गीय दैवी सृष्टीची पालना करवून, विश्वाचे कल्याण करतात. म्हणून त्यांना 'त्रिमूर्ती शिव भगवान' असेही म्हटले जाते. तसेच त्यांच्या या दिव्य कर्तव्यामुळेच शिवलिंगावर 'त्रिपुंड' लावले जाते.

– प्रकाशक अमृतकुंभ


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पू.)–४००६०३
फोन:०२२–२५३२२२०८.
E-mail : info@amrutkumbh.com.

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा :
प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे
(पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२



प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. शिवाजी चौधरी, संगणक अक्षरजुळवणी : आदिती ग्राफिक्स, उद्यमवाडी, विष्णुनगर, संभाजी पथ, ठाणे–२. मो. : ९८२१५१५०८३

**वार्षिक वर्गणी रु. ६५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/–**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या –** www.amrutkumbh.com.



(संपादकीय)

# आले, प्रभु आले, भारत भूमिवरी, अत्यानंदे शिवरात्री, करु साजरी...

भक्तिमार्गात परमेश्वराचा केवळ क्षणिक साक्षात्कार व्हावा यासाठी आपण किती महत् प्रयास करीत होतो. तीर्थ, व्रत, नेम, भजन-पूजन, जागरण, नामस्मरण अशा नानाप्रकारे परमात्म्याला आळवित होतो. प्रत्येक भक्ताच्या मनात एकच ध्यास असे की मला परमेश्वराचे दर्शन व्हावे. त्याचे मन सदैव हेच गीत गात असे -

**'मन तडपत हरी दर्शन को आज ।**
**तुम्हारे द्वार का मैं हूँ जोगी ।**
**हमारी ओर नजर कब होगी?'**

भक्तांची ही आर्त पुकार ऐकून, आता कलियुगाचे अंती शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण भारत भूमिवर झाले आहे व परमात्मा आपल्या जन्मोजन्मीच्या भक्तीचे फळ म्हणून सत्य गीताज्ञान देत आहेत. त्यामुळे सध्याच्या समयाचे गायन आहे -

**'तेरे द्वार खडा भगवान,**
**भगत भर ले रे झोली ।'**

भक्तिमार्गात तर आपल्याला याचेही ज्ञान नव्हते की नेमका एक परमात्मा कोण आहे? दुःखहर्ता, सुखकर्ता कोण आहे? तेहतीस कोटी देवी-देवतांचा रचयिता कोण आहे? पतितपावन कोण आहे? ...या सर्व प्रश्नांची उत्तरे आता आपल्याला प्राप्त झाली आहेत. त्रिकालदर्शी शिव परमात्म्याने सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान दिले आहे.

**महाशिवरात्रीचे आध्यात्मिक रहस्य -**

भारतभूमि ही परमपिता शिव परमात्म्याची अवतरण भूमि आहे. त्यामुळे संपूर्ण भारतात भगवान शिवाची लाखो मंदिरे आहेत. जेथे शिव मंदिर नाही, असे गाव नसेल. ज्या धर्मग्रंथा-मध्ये शिवाचे नाव नाही, असा धर्मग्रंथही नसेल. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे परमात्मा शिवाचा यथार्थ परिचय बहुतांशी कुणालाच नाही. तो जोपर्यंत स्वतःचा परिचय करून देत नाही तोपर्यंत त्याला कोणीही जाणू शकत नाही. म्हणूनच त्याला 'खुदा' असेही म्हटले जाते.

महाशिवरात्री शिव परमात्म्याच्या दिव्य अवतरणाचे यादगार पर्व आहे. दरवर्षी ते माघ महिन्याच्या वद्य चतुर्दशीला साजरे केले जावे. माघ महिना हा भारतीय कालगणनेनुसार अंतिम फाल्गुन महिन्याआधीचा महिना आहे. त्यातील चतुर्दशीची रात्र ही काही स्थूल रात्रीची सूचक नाही. ही रात्र आध्यात्मिक दृष्टिकोनातून कलियुगाच्या अंती सर्वत्र व्याप्त अज्ञान अंधःकाराचे प्रतीक आहे. कलियुग संपण्यापूर्वी काही वर्षे अगोदर जेव्हा सृष्टीवर अति धर्मग्लानी होते, तेव्हा ज्ञानसूर्य शिव परमात्मा अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश करण्यासाठी या सृष्टीवर अवतरित होतात. **निराकार शिव परमात्मा, एका मानवी शरीराचा आधार घेऊन (परकाया प्रवेश करून) दिव्य अलौकिक जन्म घेतात. त्यांचे नाव 'प्रजापिता ब्रह्मा' असे ठेवतात व त्यांच्याद्वारे सत्ययुगी दैवी सृष्टीची स्थापना करतात. म्हणूनच 'ब्रह्माद्वारे स्थापना' असे गायन शास्त्रातून केले जाते. तात्पर्य म्हणजे महाशिवरात्री हे परमात्म्याच्या दिव्य कर्तव्याचे यादगार पर्व आहे.**

सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे वर्तमान समयी कलियुगाच्या अंतिम पर्वात, निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण 'प्रजापिता ब्रह्मा' यांच्या साकार शरीरात सन १९३६ मध्ये झाले आहे. त्यामुळे यावर्षी आपण ८२ वी महाशिवरात्री मोठ्या उत्साहाने साजरी करीत आहोत. या सर्वश्रेष्ठ महान पर्वाचे वर्णन एका कवीने अतिशय सुंदर शब्दात केले आहे -

**याच समयी ब्रह्मा तनात,**
**शिवबाबा हे येती ।**
**सहज राजयोगाची अनुभूती,**
**अमृतवेळी देती ।**
**दैवी गुणांचे धन हे अवघे,**
**लुटून आता न्या हो ।**
**उत्साहाचे, गीत खुशीचे,**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

**आनंदाने गा हो ।।**

महाशिवरात्रीलाच शिवजयंती असेही म्हटले जाते. शिवजयंती हा सर्वोत्तम उत्सव आहे कारण तो सर्व आत्म्यांच्या परमपिता शिव परमात्म्याचा जन्मोत्सव आहे; जो विश्वभरात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला पाहिजे. याच वेळी पतितपावन शिव परमात्मा, कलियुगी पतित, विकारी कवडीतुल्य मानवाला पावन, निर्विकारी, देवतातुल्य बनवितात. म्हणूनच महाशिवरात्री ही हिरेतुल्य जयंती आहे. महिमा सारी एक परमपिता शिवाची (शिवबाबांची) आहे. म्हणूनच भक्तिमार्गात 'शिवाय नमः' असे अविनाशी गायन केले जाते.

**परमात्म अवतरणाचा उद्देश्य –**

परमात्म अवतरणाचा मुख्य उद्देश्य आहे – भक्तीचा अंधःकार दूर करून, सर्वत्र सत्य ज्ञानाचा प्रकाश पसरविणे, मनुष्य आत्म्यांना ज्ञान अमृत पाजून, त्यांना देवतातुल्य बनविणे व कलियुगी मृत्युलोकाचे स्वर्गीय अमरलोकात परिवर्तन करणे. मागील ८१ वर्षापासून हे ईश्वरीय कार्य, प्रजापिता ब्रह्मा यांच्याद्वारे स्थापित, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाद्वारे चालू आहे. आता हे कार्य संपन्नतेच्या समीप आहे. त्यामुळे प्रत्येकाने या हिरेतुल्य संधीचा लाभ घेऊन, आपले जीवन धन्य-धन्य बनवावे. याचेच गायन आहे – 'ब्रह्माने भाग्य वाटले...'' वर्तमान समयी परमात्मा शिव पिता, प्रजापिता ब्रह्मामुखाद्वारे जे ज्ञान देत आहेत, त्याच्या धारणेनेच आपले अनेक जन्मांचे सद्भाग्य बनते.

परमात्मा शिव पिता, सर्व आत्म्यांचा सद्गतिदाता आहे. त्याचे दिव्य अवतरण प्रत्येक कल्पाच्या अंती (कलियुगात) भारतातच होते. त्या अनुषंगाने **शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये अतिशय बोधपूर्ण आहेत – 'मीठे बच्चे, भारत कितना गरीब बन पडा है। मैं भी गरीब निवाज हूँ। आता भी मैं भारत में ही हूँ। यहाँ बैठ सारे विश्वकी सद्गति करता हूँ। इसलिए सभी से बडा तीर्थ यह है। आबू सभी धर्मोंके मुख्य तीर्थो में मुख्य तीर्थ है।''**

**भाग्यविधाता भगवान, भारत व भाग्य –**

भारत महान आहे व विश्वाचे आदि स्थान आहे. भारताच्या महानतेचे रहस्य हे आहे की, परमपिता परमात्मा जो मनुष्य सृष्टीरूपी कल्पवृक्षाचा बीजरूप आहे, त्याचे अवतरण प्रत्येक कल्पाचे अंती (कलियुगात) भारतातच होते. परमात्मा अविनाशी असल्याने, त्याची अवतरण भूमि भारत ही देखील अविनाशी आहे. अर्थात भारताचा कधीही पूर्ण विनाश होत नाही. भारतात अवतरित झाल्यानंतर परमात्माद्वारा जे सत्य गीता ज्ञान दिले जाते, त्याद्वारेच विश्वाचे कल्याण होते. म्हणूनच भारताला साऱ्या विश्वाचा 'आध्यात्मिक गुरु' असे संबोधले जाते.

परमात्मा शिव पिता जो आदि सनातन देवी-देवता धर्म स्थापन करतात, तोच सर्व धर्मांचा आधारस्तंभ आहे. आदि सनातन देवी-देवता धर्म वंशाचे जे आत्मे आहेत, त्यांच्यात परमात्मा श्रेष्ठ चारित्र्याचे प्रत्यारोपण करतात व त्याच्यातच पूर्वजपणाची भावना जागृत करतात. आदि सनातन देवी-देवता धर्म जो कल्पवृक्षाचे खोड आहे; त्यापासूनच सर्व धर्मांच्या शाखा निघतात. त्यामुळे सर्व धर्मांचा आदि भारत देशच आहे. परमपिता परमात्मा भारतातच स्वर्गाची स्थापना करतात. त्यामुळे कलियुगी सृष्टीच्या महाभारी विनाशानंतर, सत्ययुगात ही भारत भूमि पुन्हा स्वर्ग भूमि बनते. म्हणूनच आजही गायन केले जाते – 'जहाँ डाल-डालपर सोने की चिडियाँ करती थी बसेरा, वो भारत देश है मेरा...'' स्वर्गात सर्व मनुष्यात्मे सत्त्वप्रधान असतात व प्रकृतीदेखील सत्त्वप्रधान असते. येथे सर्वत्र पवित्रता, सुख, शांती व समृद्धीचे साम्राज्य पसरलेले असते.

परमात्मा शिव पिता 'सत्य' आहे. तोच भारतात 'सच-खंड' स्थापन करतो. त्यावेळी भारताशिवाय अन्य कुठलाही खंड नसतो. भारतात देवी-देवतांचे राज्य होते. म्हणूनच त्याला स्वर्ग असे म्हटले जाते. ५००० वर्षापूर्वी भारतात स्वर्ग होता. आता पुन्हा परमात्मा शिव पिता त्याची स्थापना करीत आहेत.

अशा या महान भारतात, वरदानी भूमित जन्म घेणे, महान सौभाग्याची व गौरवाची गोष्ट आहे. मुख्य म्हणजे वर्तमान संगमयुगात परमात्मा शिव पित्याला ओळखून, त्याच्या दिव्य कर्तव्यात सहयोगी बनल्याने, आपल्याला स्वर्गाची बादशाही प्राप्त होते. या अनुषंगाने **परमात्मा पित्याची**

**पुढील वरदानी महावाक्ये सदैव लक्षात ठेवा – ''मीठे बच्चे, भारतवासी शिव जयन्ती मनाते है, तो जरूर शिवबाबा आकर विश्व का मालिक बना कर गये होगे। तब तो उनकी जयन्ती मनाते है । लाखों वर्ष की बात नही है । ५००० वर्ष की बात है । यह भी बाप आकर समझाते है ।''**

**महाशिवरात्री कशी साजरी कराल? –**

सर्वप्रथम महाशिवरात्री निमित्त शुभ व श्रेष्ठ वृत्तीचे व्रत धारण करा. म्हणजे वाणी व कर्म देखील आपोआपच शुभ व श्रेष्ठ होईल. हेच खरे शिवरात्रीचे व्रत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शिवरात्रीचे पर्व हे शिव परमात्म्यावर बळी चढविण्याचे पर्व समजले जाते. याचेच प्रतीक म्हणून काही ठिकाणी बळीदेखील चढवितात. परंतु मन, बुद्धी व सर्व संबंधाने शिवबाबांवर समर्पित होणे म्हणजे खऱ्या अर्थी बळी चढणे होय. तिसरी गोष्ट म्हणजे शिवलिंगावर अक व धोतऱ्याची फुले वाहतात. वास्तविक ही विषारी फुले वाहण्यामागील रहस्य हे आहे की आपल्यातील विषतुल्य पाच विकारांचे दान शिव परमात्म्याला अर्पण करून, जीवनात पवित्रतेचे व्रत धारण करणे. चौथी गोष्ट म्हणजे महाशिवरात्रीच्या दिवशी भक्तगण जागरण करतात. वास्तविक कलियुगी अज्ञान रात्रीत ईश्वरीय ज्ञानाद्वारे आत्मिक ज्योति सदैव जागृत ठेवणे, हेच खरे जागरण होय. या आध्यात्मिक जागरणाद्वारेच आत्म्याला मुक्ती व जीवनमुक्तीची प्राप्ती होते. त्यामुळे यावर्षी आपण यथार्थ रीतीने महाशिवरात्री साजरी करु या.

**आता शिवरात्री निमित्त परमात्म अवतरणाचा झेंडा सर्वत्र फडकवू या. विश्वाच्या कानाकोपऱ्यात शिवबाबांचा झेंडा फडकला पाहिजे. विश्वभरात ईश्वरीय कार्याचे स्वागत झाले पाहिजे. सर्वांच्या मुखातून हेच गीत बाहेर पडले पाहिजे – 'हमारा शिवबाबा आ गया' परमात्मा पिता या सृष्टीवर आले आहेत, आपले दुःख दूर करण्यासाठी. आपल्याला सदा सुखी बनविण्यासाठी आले आहेत.** आता लवकरच आपल्या भाग्याचा सूर्य उदित होणार आहे, याचा अत्यानंद प्रत्येक आत्म्याला झाला पाहिजे. हाच भाव पुढील काव्य पंक्तीतून व्यक्त करण्यात आला आहे –

**हिरेतुल्य हा काळ सुखाचा,**
**नका घालवू वाया ।**
**शिवबाबांना नित्य स्मरावे,**
**आत्मा पवित्र व्हाया ।**
**मौल्यवान ही संधी असली,**
**पुन्हा मिळेल का हो?**
**अत्यानंदे महाशिवरात्री,**
**साजरी करु या हो ।**

## वाचकांशी हितगुज

※ अमृतकुंभ व अमृतकलश या दोन्ही द्वैमासिकांचा विचार करता सन २०१८-१९ हे मराठी द्वैमासिकाचे ३४ वे वर्ष आहे. आतापर्यंत वाचकांनी अतिशय उत्तम प्रतिसाद दिला; याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार! **परंतु आता आपणाकडून आवश्यकता आहे ती वेहद वा व्यापक सेवेची कारण हे वर्ष संपूर्णता व समाप्तीचे वर्ष आहे.** त्यामुळे प्रत्येक मराठी भाषिक माणसाच्या घरापर्यंत ईश्वरीय ज्ञानाचा 'अमृतकुंभ' मला पोचवायचाच आहे असा दृढ संकल्प आपण करू या.

※ वाचकांनी तसेच सेवाकेंद्राच्या निमित्त टीचर बहिणींनी एप्रिल २०१८ पासून सुरु होणाऱ्या, नवीन वर्षाच्या 'अमृतकुंभ' ची मागणी फेब्रुवारी २०१८ अखेरपर्यंत कळवावी. म्हणजे त्यानुसार अंक छापणे सुकर होईल.

※ **मुख्य म्हणजे पुढील वर्षाची वर्गणी सध्या इतकीच रु. ६५/– राहील.** वर्गणीची रक्कम लवकरात लवकर 'प्रकाशक अमृतकुंभ' यांच्या पत्त्यावर पाठवावी. तसेच डिमांड ड्राफ्ट पाठवितांना तो 'अमृतकुंभ, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, या नावानेच पाठवावा.

※ आपले काही विशेष अनुभव, लेख, कविता तसेच अमृतकुंभाविषयी काही सूचना असल्यास त्या अवश्य कळवाव्यात.

– प्रकाशक अमृतकुंभ



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# जेव्हा शिवबाबा हसवतात ...

## ब्र. कु. अनुराधा खोत, पुणे

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात प्रवेश झाल्यानंतर आपण योग्य वेळी 'मुरली' ऐकायला प्रारंभ करतो. या ज्ञानमुरलीचं महत्त्व शब्दातीत आहे. ज्ञानाचा सर्व साठा त्यातूनच तर मिळतो. परंतु ते ज्ञान देताना परमशिक्षक शिव परमात्मा वेगवेगळ्या भूमिकात जातो. कधी कडक शिस्तप्रिय पंतोजी तर कधी प्रेमळ पिता, परमपिता. कधी सद्‌गुरु, तर कधी विनोद करणारा मित्र! हसवणारी व्यक्ती ही सर्वत्र लोकप्रिय असते. त्यामुळे गंभीर गोष्टींची जाणीव करून देणारे, गुह्य गोष्टी समजावून देणारे **शिवबाबा जेव्हा आपल्याला हसवतात तेव्हा जबाबदारीच्या जाणिवेनं जड होऊ पाहणारं डोकं एकदम हलक होत. मुरली रंजक होते आणि विसंगती लक्षात आल्यामुळे आपले पाय जमिनीवर राहतात. अहंकाराची बाधा होत नाही. पुरुषार्थ चालू राहतो.**

शिवबाबांची शिकवण नेहमी असते ती म्हणजे 'खुश रहो' ही. खरोखरच जगाला माहितीच नाहीत अशा अतिशय विलक्षण गोष्टी आपल्याला या ज्ञानातून कळतात. उदा. परमात्मा पित्याचं रूप, नाव, स्थान, काळ आणि कर्तव्य. राजयोग या शब्दाचा खरा अर्थ माहिती होतो. परमधामाची माहिती होते. हे सगळ अतिशय आनंददायी आहे. तरी आपण देहभानाच्या जुन्या सवयीमुळे अधूनमधून निराश होतो. उदास होतो. मग बाबा मुरलीतून आठवण देतात. तुम्ही मुळात कोण आहात, कसे आहात हे आठवा. तसेच भविष्यात कोण होणार आहोत तेही आठवा. सगळ खुशीचं साम्राज्य आहे हे, तरी तुम्ही उदास कसे होऊ शकता? पण बाबा ते कसं सांगतात पहा. 'जो खुश नही वो बुद्दू हैं!'

हे वाक्य ऐकल की फुटत ना हसू? मग आपली चूक उमजते आणि आपण पुन्हा फुलारतो. खुशीचा खुराक चालू राहतो. हे हसण्यानं साधतं.

भल्या पहाटे 'अमृतवेळा' साधण्याचा प्रयत्न तर साऱ्यांचा चालू असतोच. पण काही विद्यार्थ्यांची अमृतवेळा कशी होते. ते बाबांच्या शब्दात वाचण्याजोग आहे.

'कभी नेमिनाथ बन योग लगाते। कभी वह झुटका योग होता। कभी निद्रायोग होता। कभी अलबेलेपनका योग होता। आलस्य आता। बाबा, बहुत थका हूँ। आज सो जाता हूँ।

हे तरी ठीक परंतु जे बच्चे बाबांचे होतात अन् मधेच संघटनेपासून दूर होतात, सोडूनच जातात त्यांच्याविषयी पहा बाबा काय म्हणतात.

'मेरा बनंति, आश्चर्यवत् सुनंति, कथंति, ध्यानमें जावंति, माला में, पिरवंति, फिर - एकदम भागंति हो जाते है।'

वाचून आपल्याला हसू लोटत की नाही? बाबा कसे मिस्किल आहेत कळत. संस्कृत भाषेचा कित्येकांना खूप अभिमान असतो. परंतु तो दुरभिमान होऊ नये आणि ती न येणाऱ्या लोकांना त्यांनी कमी लेखू नये, यासाठी बाबा असा विनोद करतात. तो संस्कृत भाषेचा अपमान नसतो. शिवाय या वाक्यातून सत्य, पवित्र, ज्ञानाला न ओळखणारे कसे वागतात त्याची आपल्याला जाणीव होते.

एका मुरलीत बाबा आपल्याला सांगतात; 'तुम ब्राह्मण हो पहले नंबरके जिन्न! काम दो नहीं तो खा जाएंगे । इसलिये सीढ़ी चढने उतरनेका काम दिया है ।'

अल्लाउद्दीनचा दिव्याचा राक्षस आठवला ना? त्याची उपमा देताहेत बाबा. आपण सृष्टिचक्रात पायऱ्या उतरणं नि चढणं हे अव्याहत करीत राहिलो आहोत. फक्त चक्राच्या शेवटी ज्ञानाची 'लिफ्ट' मिळते ब्राह्मणांना. हे झालंच, परंतु बाबा याद्वारे सुचवतात की तुम्ही मनाला काम द्या. विचार सागरमंथन करीत राहा.



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

गेल्याच वर्षीच्या अवतरणात बाबांनी हसवलं होत. म्हणाले, 'भक्तीमें कितना कष्ट है। यहाँ आराम से कुर्सीपर बैठे हो। लेटनेका रखें तो आधे तो परमधाम में चले जाएँ।'

खुर्चीवर आरामात बसला आहात तेवढ पुरे. लवंडून ऐकण्याची व्यवस्था केली तर निम्मे पोहोचतील परमधामात – म्हणजे झोपीच जातील डाराडूर!

व्यक्तिगत भेटीमधे सुद्धा बाबांचे चातुर्य बघण्यासारखे आहे. एकदा ज्ञानात असणारं एक युगल बाबांच्या भेटीस गेलं. दोघंही अटीतटीन, पुरुषार्थ करीत असावेत. बाबांनी विचारलं,

'दोनोंमें कौन आगे है?' दोघं एकमेकांकडे पाहू लागले. तेव्हा बाबाच म्हणतात,

'दोनो एक दूसरेसे आगे हो ना?' ऐकून दोघेही हसू लागले.

यज्ञाच्या प्रारंभानंतरचा एक प्रसंग ऐकला. त्यातही उत्तरात अशीच मौज आहे.

मूळ आबू पहाडावरचं पांडव भवन बनल. नंतर जेव्हा इतरत्र सेवा होऊ लागली तिथे ही भवन उभी राहिली. तेव्हा बाबांना विचारण्यात आलं –

'वास्तुका नाम क्या रखे? पांडव भवनही रखे?' बाबा म्हणाले, 'किसीके चार बच्चे हैं। चारोंका नाम एकही रखे तो?'

एका मुरलीत बाबा म्हणतात,

'रिचेस्ट बननेके लिए बिंदी लगाओ बस। कितना सहज साधन है। बिंदी लगाना मुष्किल है? बिंदी खिसक जाती है क्या? सबसे सहज है बिंदी लगाना । मैं आत्मा हूँ, समझना ।

'खिसक जाती है क्या?' हा प्रश्न ऐकून आपली आजकालची टिकली आठवते ना? पूर्वी बायका कुंकू लावत, मेणावरती. ते 'खिसकण्याचा' प्रश्न नव्हता. ही टिकली मात्र डिंक संपला की गळून पडते. अर्थात् बाबा ज्या टिकली विषयी सांगताहेत ती अविनाशी टिकली आहे. आत्म-स्वरूपात राहणं; दिनचर्या आत्मिक स्वरुपात राहून चालावी हा प्रयत्न असला पाहिजे. आणि 'व्यर्थ' ला येऊं द्यायचं नाही. हाच याचा खरा अर्थ.

**द्वापर युगातल्या शास्त्रांमुळे आपण श्रीकृष्णाला भगवान म्हणू लागलो. ती चूक दाखवून देतांना बाबांनी खडा प्रश्न टाकलाय.**

**'बाप इतनी दूर से आते है । राजयोग सिखाएंगे कि लकड़ीकी मुरली बजाएंगे?'**

बाबा येतात ते आत्म्यांना पावन बनवायला अन् त्याच साधन आहे ज्ञान. हेच ते लक्षात आणून देतात.

काही बच्चे निराश होतात; पढ़ाईच्या म्हणजे ज्ञानाच्या विषयात त्यांना बाबा सांगतात,

'दिलशिकस्त नही होना क्योंकि पढ़ाई तो सहज है। उसकी कोई फीज भी नहीं।'

हे ऐकलं की लांब तोंड करून बसलेल्या विद्यार्थ्याला खुदकन हसू येतं. खरंच, फी तर बाबा घेत नाहीत. पण पुढे लगेच बाबा बजावतात – हिंमत ज़रुर चाहिए।

बाबा बघत असतात. निद्राजीत मुलांना आणि झोपेचे गुलाम असणाऱ्यांनाही. मग बाबा मिस्किलपणे म्हणतात, 'बाप-दादा दोनोंको नींदकी ज़रुरत नहीं।' खरं आहे. पण आम्हाला आहे ना! आपण मनातल्या मनात म्हणतो यावर बाबांनी सांगितलंच आहे-

'आठ घंटा नींद करो, आठ घंटा याद करो, आठ घंटा कामधंदा करो।'

पण ते दोघेही सतत जागे असतात; जागती ज्योति असतात. म्हणूनच आपल्याला रात्रंदिवस पालना देतात. संकटात धावून येतात. प्रश्न पडला तर उत्तर सुचवतात. अन् आपल्यामधे जे कुंभकर्णाचे अवतार आहेत अशांविषयी बाबा काय म्हणतात पहा-

'ज्यादा सो लेते तो हाथसे विकर्म तो कम होते।' आपल्याला हसूच येतं हे ऐकून. कारण झोपेचा हा वेगळाच उपयोग आपल्या कुठे लक्षात आला होता?

पुरुषार्थ ज्यांचा ठीक होत नाही अशांना एका मुरलीत बाबांनी कशी धमकी देऊन ठेवली आहे पहा –

'अगर पुरुषार्थ नही किया तो मायासे हार खाएंगे फिर द्वापरमें हार बनाने पड़ेंगे।'

डोळ्यांपुढे चित्र येतं लगेच, मंदिराबाहेर बसून हार तयार करून ते विकणाऱ्याचं. एकीकडे हसू येतं नि दुसरीकडे वाटते भीती – नको रे बाबा ते हार करणं. ना त्यामध्ये देवभक्ती ना खरी श्रद्धा – केवळ पोट भरण्याचा



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

व्यवसाय झालाय तो या घोर कलियुगात. काही ठिकाणी तर मंदिरात मूर्तीला हार चढवला की भक्त बाहेर पडताच तो हार काढून आणून, पुन्हा विक्रीला ठेवला जातो!

लोकसंख्येचा स्फोट झालाय. संतति नियमनाचे सगळे प्रयत्न फोल ठरले. बाबा म्हणतात –

**'तुम्हारा फॅमिली प्लॅनिंग अब बस हो गया। अब मैं ही फॅमिली प्लॅनिंग करता हूँ।'**

**अर्थात् बाबांच फॅमिली प्लॅनिंग वैश्विक पातळीवरचं. कल्पांतर करणार. भिंती पाडून सर्वांना एकत्र आणून जगातल्या सर्वांच खरोखर एकच कुटुंब बनवणारं. तेही देवगुणी मुलांच सुवर्णयुग आणणार. अफाट समृद्धी आणि थोडी लोकसंख्या असणारं. एक छत्री, एक धर्मी, एक भाषी स्वर्गाची पूर्वतयारी करणारं.**

आपला मिलन मेला असतो.– रूहानी (आत्मिक) केवळ प्रेमानं एकत्र येणाऱ्या आत्म्यांचा. प्रकाशबिंदूंचा. आपल्या आत्मिक यात्रेचं, मीलनाचं वर्णन बाबा एका वाक्यात करतात –

'यह रुहानी मेला है । यहाँ ॲक्सिडेंट नहीं। स्थूल मेले में होता है।'

हे वैशिष्ट्य बाबा सांगतात. तेव्हा ते आपल्या लक्षात येतं.

आपण कुठल्यावरी कामात रमलो की बाबाचं स्मरण विसरतो. बाबा विचारतात,

'बेबी भी बापको भूलती नहीं। तुम कैसे भूलते?' बाळ कसं आईवडिलांना सदोदित चिकटून असतं. खरच आपण कसं विसरतो मोठे असून? असा प्रश्न मनात उमटतो.

आपण अभ्यासात कुचराई केली की बाबा आठवण करून देतात ती कशी –

'मैं आता हूँ राजयोग सिखलाने। यह है राजयोग, प्रजायोग थोडे ही है?'

एरवी बाबा सांगतात, मियाँ मिठ्ठू बनना नही है। परंतु एका मुरलीत म्हटलं आहे.

'मैंही हूँ मियाँ मिठ्ठू, तुम्हें मीठा बनाने आया हूँ।' इथे मीठूचा अर्थ आहे मीठा–मीठा. स्वीटेस्ट. सॅक्रिन! गोड तर आहेच तो.

तो प्रेमसागर आहे, क्षमाशील आहे हे खरं. परंतु त्याच्याजवळ कामचुकारपणा, नॉन्सेन्स नाही चालत. एके ठिकाणी मुरलीत ते म्हणतात, 'प्यार तो करते हो, पर तोड़ निभानेमें नंबर वार हो। जो भी हूँ, जैसी भी हूँ, तुम्हारी हूँ – ठीक है, पर जोड़ी तो जमे ना। समानता हो।'

आपण खाड्‌कन जमिनीवर येतो. आपण आणि बाबा केवढ अंतर! हे लगेच कळतं. वरवरच्या बोलण्यातून बोलणाऱ्याचा उथळपणा वा तपस्येचा अभाव लगेच लक्षात येतो. पण म्हणून निराश होऊ देत नाहीत बाबा. लगेच सांगतात –

'जल्दी जल्दी दाग मिटा दो। चमकीली ड्रेस पहने हुए चमकीली दुनियामें क्यों नही रहते? माशूकके समीप रहो तो समान बनेंगे।' किती वत्सल, किती क्षमाशील!

खरी गंमत वाटली होती ती या वाक्याची जेव्हा बाबा म्हणाले होते कि – 'अन्तमें बाप सबको मच्छर सदृश ले जाएंगे।' संध्याकाळच्या वेळेस दलदल वा झाडीपाशी खरंच डासांचा थवा दिसतो. त्याची आठवण झाली. पण 'मच्छर सदृश' का म्हटलं बाबांनी? कळेना. मग विचारमंथन चालू झालं.

मुरलीमध्ये इतरत्र जे जे बाबा बोलतात ते अशा वेळी जोडून घ्यायचं असतं.

पुरुषोत्तम संगमयुगी ब्रह्मामुखवंशावली ब्राह्मणांमधले काही पुण्यशील, तपस्वी पवित्र आत्मे पुरेपूर तपस्या करतात. चारही विषयात उत्तम गुण मिळवतात. सन्मानासहित पास होतात परीक्षेत. ते सारे अतिरथी – महारथी आत्मे म्हणजे कल्पांती परमधामाच्या दिशेनं निघणाऱ्या शिवबाबांच्या वरातीतल्या त्यांच्या समान झालेल्या साजणी. बाबा राम तर आपण आत्मे सीताएँ! त्यानंतर कमी अधिक पुरुषार्थ केलेले सगळे – त्यांचा ताफा. त्यांच्या नंतर धर्मस्थापक आत्मे– भक्तजन – अन्यधर्मीयांचे जथे. त्यानंतर शेवटी मग उरले सुरले सारे आत्मे. कसेही असोत, बाप शेवटी बाप आहे ना! तो त्यांनाही पावन करून घेतो अन् मग त्या अब्जावधी आत्म्यांना घेऊन परमधामाकडे निघतो. डास बारीक असतो. आत्मेही सूक्ष्म – फक्त ते ज्योतिबिंदु एवढाच दिसणारा फरक. तर मग तो थवा दिसणारच ना डासांच्या



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

थव्यासारखा? अशी गंमत आहे.

**फक्त एवढंच की आपण बाबांच्या 'समान' बनलेल्या 'सजनियाँ' मधे असावं, प्रेमळ पित्याबरोबर लाडक्या मुलांमध्ये असावं यासाठी 'मन्मना भव' हा मंत्र आपलासा करून, श्रीमतावर चाललं पाहिजे. तर खरी मौज आहे.**

तेव्हा अस हसत हसवत बाबा आपल्याला शहाणं आणि दैवी गुणांनी संपन्न करण्याच्या अविरत प्रयत्नात असतात. त्यांच्या विनोदबुद्धीच्या असंख्य उदाहरणांनी मुरल्या भरलेल्या आहेत. तुम्हालाही सापडलीत ना अशी उदाहरणं!

## नम्र विनंती ही सर्वांना ...

फळ भक्तीचे ज्ञानासोबत, मुक्ती जीवनमुक्ती ।
संगमयुगात शिव परमात्मा, स्वयेच येऊन देती ।। धृ ।।
नम्र विनंती ही सर्वांना, विद्यालयात या हो ।
यज्ञ शिवाचा कसा आहे, हे समजावूनी घ्या हो ।
अपसमजची अफवा टाकुनी, घ्या हो दिव्य प्रचिती ।
संगमयुगात शिव परमात्मा, स्वयेच येऊन देती ।। १ ।।
गीतेमधला राजयोग हा, सोपा करून सांगती ।
देवपदाला प्राप्त होती ते, तैसे जे वागती ।
ज्ञानरत्ने रोज वाटती, मुरली मधून प्रभाती ।
संगमयुगात शिव परमात्मा, स्वयेच येऊन देती ।। २ ।।
अमृतवेळी प्राप्त करा हा, प्रकाश प्रज्ञानाचा ।
उजळा अपुल्या आत्मज्योतिने, मार्ग जीवनाचा ।
सुवर्णसंधी साधून घेणे, असे अपुल्या हाती ।
संगमयुगात शिव परमात्मा, स्वयेच येऊन देती ।। ३ ।।

**– एक ब्रह्माकुमार**

## परमपिता शिव भगवान

परमात्मा तो पिता जगाचा, एकच शिव भगवान ।
संगमयुगी या बनवी पावन, भारत भूमि महान ।। धृ ।।
सुवर्ण भूमि पावन भूमि, पूर्वज सर्व जगाची ।
भारतवासी बंधु-भगिनींना, पर्वणी शिवरात्रीची ।
कलियुगाची काळरात्र सरता, येईल सत्ययुग महान ।
संगमयुगी या बनवी पावन, भारत भूमि महान ।। १ ।।
'मन्मनाभव' मंत्र सांगतो, विसरा देहभानाला ।
एक बाप दुसरा न कोणी, जिंका माया रावणाला ।
नष्टोमोहा बनून घेऊ, स्वर्ग सुखाचे वरदान ।
संगमयुगी या बनवी पावन, भारत भूमि महान ।। २।।
विश्व परिवर्तन करण्याला, निमित्त बनू या सारे ।
शिवबाबांच्या अवतरणाचा, संदेश देऊ या सारे ।
सहज राजयोग शिकून होऊ, देवी-देवता महान ।
संगमयुगी या बनवी पावन, भारत भूमि महान ।। ३ ।।

**ब्र. कु. वसंत निंबाळकर, कागल (कोल्हापूर)**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# समस्त धर्मियांना मान्य होईल असा परमपिता परमात्म्याचा हृदयस्पर्शी परिचय (भाग – १)

**ब्र. कु. उज्ज्वलाताई, पुणे**

भिन्न भिन्न धर्मातील आस्तिकवादी मनुष्यात्म्यांच्या मुखातून परमात्म्याविषयी भगवान, ईश्वर, अल्लाह, गॉडफादर इत्यादी शब्द वारंवार उच्चारले जातात. परंतु त्या एका परमात्म्याचा सर्व धर्मांना मान्य होईल असा यथार्थ परिचय मात्र कोणालाच देता आला नाही. परमात्म्याला प्राप्त करण्यासाठी मनुष्य कित्येक वर्ष त्याचा शोध घेत आहे. परंतु अद्यापही त्याचे शोधकार्य पूर्ण झाले आहे; असे वाटत नाही. जर कोणा मनुष्याला त्या सद्गती दात्याचा शोध लागून त्याच्याशी संवाद साधता आला असता तर त्याचे नाव, रूप, गुण, धाम, त्याच्या विशेषता, त्याची कर्तव्य कर्मे व मनुष्य आत्म्यांशी असलेल्या संबंधासहित, त्याने सर्व विश्वाला परमात्म्याचा यथार्थ परिचय करुन दिला असता. इतकेच नव्हे तर त्याचे रूप कसे आहे हे समजण्यासाठी त्याने त्याची प्रतिमाही निर्माण केली असती. फलस्वरूप सर्व धर्मातील उपासकांनी त्या एकाच परमात्म्याची उपासना केली असती. तसेच द्वापरयुगापासून भिन्न भिन्न देहधारी देवात्मे, महात्मे व धर्मात्मे ह्यांच्या नावापूर्वी 'भगवान' ही उपाधी लागली गेली नसती. बंधुनो, जर मनुष्यात्म्यांना त्या परमात्म्याचा शोध लागला असता तर 'युगे-युगे परमात्म्याचा शोध' हा विषय कोणत्याही पुस्तकात आला नसता. परमात्म्याचा शोध न लागल्याने ऋषी मुनींनीही अंतिम अनुमान हेच काढले आहे की, 'परमात्मा बेअंत आहे' कालांतराने काही योग्यांनी 'ब्रह्मतत्वच परमात्मा आहे' असे घोषित केले. ह्या शिवाय परमात्मा सर्वव्यापी आहे, आत्माच परमात्मा असून तो नावारुपापासून मुक्त आहे इत्यादी मिथ्या मान्यता आस्तिकवादी समाजात रुजल्या गेल्या व त्यातूनच मानवी मनात अंधश्रद्धेचा उगम झाला. परमात्म्याचे वास्तविक रूप कसे आहे? त्याचे शाश्वत असे निवासस्थान कोणते आहे? तो कोणती कर्तव्ये करतो व कोणती करीत नाही? ह्या विषयी मनुष्यआत्मे प्रदीर्घ काळ संभ्रमित आहेत. **संत महात्म्यांना अनेकानेक साक्षात्कार अवश्य झाले आहेत. परंतु त्यामुळे एका परमात्म्याचा यथार्थ परिचय मात्र कोणालाही प्राप्त होवू शकला नाही. ह्या परिचयासाठी मनुष्यआत्मे गेली दोन युगे प्रतिक्षा करीत आहेत. ही प्रतिक्षा समाप्त झाल्याने स्वतः परमात्मा अवतरित होवून, स्वतःचा परिचय स्वतःच देत आहे. अर्थात परमात्म्याचा शोध न लागल्याने स्वतः परमात्म्यालाच ह्या साकार सृष्टीवर प्रगट व्हावे लागले.**

आश्चर्य तर हेच आहे की, परमात्म्याचा परिचय नसताना तसेच त्याच्या विषयी मनात अनेक संभ्रम असतानाही 'ईश्वर एकच आहे' (God is one) ह्या विषयी समस्त आस्तिकवाद्यांचे एकमत आहे. म्हणून कित्येक संत महात्म्यांनी म्हटले आहे की, 'सबका मालिक एक है ।' इस्लाम धर्माचे लोक त्याला 'अल्लाह' तर ख्रिश्चन धर्माचे लोक त्याला प्रेमाने 'गॉडफादर' म्हणतात. गॉडफादरचा अर्थ आहे परमपिता. भक्तिमार्गातही त्याचे गायन आहे 'त्वमेव माताश्च पिता त्वमेव'... अशा प्रकारे परमात्म्याचा अत्यल्प परिचय अवश्य आहे परंतु संपूर्ण व यथार्थ परिचय मात्र कोणालाच नाही. त्याच्या यथार्थ परिचया अभावी मनुष्याची बुद्धी पथभ्रष्ट झाली आहे. तो कधी चतुर्भुज श्री विष्णूला, कधी दत्तात्रयाला, कधी श्री शंकराला, कधी श्रीरामाला, कधी श्रीकृष्णाला तर कधी श्रीगणेशाला परमात्मा मानून त्याची उपासना करीत आहे. 'परमात्मा एक आहे' ही मान्यता असतानाही परमात्म्याच्या मंदिरासहित अन्य मंदिरातही भिन्न भिन्न देवतांच्या जडमूर्तींच्या समोर हात जोडून करोडो भक्त 'हे भगवान' ह्या शब्दाने पुकारतात. देवात्मा व परमात्मा हे दोन्ही भिन्न आहेत



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

हे ज्ञात नसल्याने, भक्तगण आपले मत व्यक्त करतात की, 'तुम्ही कोणाचीही भक्ती केली तरी ती परमात्म्या पर्यंत पोहचते. ही सर्व रुपे त्या परमात्म्याचीच आहेत' असे संदिग्ध समर्थनही त्यांच्या द्वारे केले जाते.

बंधुनो, जो पर्यंत एखादी व्यक्ती स्वत:चा परिचय करुन देत नाही तो पर्यंत त्या व्यक्तीचा वास्तविक यथार्थ परिचय कोणालाही प्राप्त होवू शकत नाही. परमात्मा जन्म-मृत्युच्या चक्रातून सदा मुक्त असल्याने तो कदापी मनुष्य सदृश मातेच्या गर्भातून जन्म प्राप्त करुन व्यक्त होत नाही. त्याच्या व्यक्त होण्यात अलौकिकता, गुह्यता व दिव्यता असते अर्थात आकाशतत्वाच्या पार असलेल्या परमधामाहून तो ह्या साकार सृष्टीवर साकार शरीरात अवतरित होतो. हाच विश्वकल्याणार्थ त्याने घेतलेला दिव्य जन्म होय! ज्या साकार वृद्ध शरीरात तो अवतरित होतो, त्याचे तो 'प्रजापिता ब्रह्मा' असे अलौकिक नामकरण करतो. ह्याच ब्रह्माच्या मुखाद्वारे 'निजानंद स्वरुपम् शिवोहम्' ही दिव्य वाणी प्रगट करुन त्याने आपले 'शिव' हे नाव घोषित केले आहे. ज्या प्रमाणे परमात्मा अनादि आहे तद्वतच त्याचे 'शिव' हे नाव देखील अनादि आहे. मनुष्यांची नावे अथवा देवतांची नावे ही त्यांनी मातेच्या गर्भातून धारण केलेल्या विनाशी देहस्वरूपाशी संबंधित असतात, तर परमात्म्याला आपला देहच नसल्याने त्याचे नाव हे त्याच्या अविनाशी आत्मस्वरूपाशी संबंधित आहे. परमात्मा सुख, शांती, आनंद, प्रेम, पवित्रता, ज्ञान व शक्ती ह्या अनादि गुणांचा सागर आहे. तो मनुष्यात्म्यांचा मात-पिता तर आहेच, ह्या शिवाय सर्व आत्म्यांची सद्गती करणारा सद्गुरू व विश्वातील सर्वोत्तम ज्ञान देणारा सद् शिक्षकही आहे. तो सर्व पित्यांचाही पिता व आपल्या कर्तव्य कर्मात सर्वश्रेष्ठ असल्याने त्याला परमपिता म्हटले जाते. अशा ह्या परमपित्याला विश्वातील आपल्या सर्व आत्मिक पुत्रांचे (मनुष्यात्म्यांचे) कल्याण करुन त्यांना २१ जन्मांसाठी सुखशांतीचा वारसा हक्क द्यावयाचा असल्याने तो सर्व धर्मातील सर्व आत्म्यांसाठी अवतरित होतो. परमात्मा सर्वांसाठी एकच असल्याने परमात्म प्राप्ती व त्याच्यापासून होणाऱ्या अलौकिक प्राप्तींचा अधिकार कोणा विशिष्ट संतमहात्म्यांना, विशिष्ट धर्माला अथवा एखाद्या संप्रदायाला निश्चितच नाही. ईश्वर विश्वातील सर्व आत्म्यांसाठी कॉमन असल्याने ह्या विद्यालयाच्या नावात 'ईश्वरीय विश्वविद्यालय' हे शब्द आहेत. त्या ईश्वराचा अर्थात परमात्म्याचा परिचय देण्याचे कार्य हे विद्यालय करीत आहे. तो परिचय यथार्थतः प्राप्त व्हावा म्हणून येथे प्रथमतः आत्म्याचा परिचय दिला जातो. असे म्हटले जाते की, 'जो खुदको जान सकता है, वह खुदाको भी जान सकता हैं ।' (जो स्वतःला जाणू शकतो, तो परमात्म्यालाही जाणू शकतो) हे त्या खुदाला अर्थात परमात्म्यालाही ज्ञात असल्याने त्याने आपल्या परिचया बरोबरच मनुष्याला (जीवात्म्याला) त्याचा परिचय करुन दिला आहे की, 'तुम्ही हा अस्थिमांसाचा देह नसून, ह्या देहाला चालविणारी चैतन्य सत्ता आत्मा आहात.' परंतु स्वतःची अर्थात आत्म्याचीच सर्वांना विस्मृति झाल्याने सुप्रसिद्ध लेखकही आत्मचरित्र लिहिताना त्यात आत्म्याचा उल्लेख कुठेही करीत नाहीत. अर्थात ते स्वतःला देह समजूनच आत्मचरित्र लिहितात. त्यांना हे ज्ञान नाही की, देह हा तर आत्म्यासाठी कर्म करण्याचे साधन आहे. अर्थात शरीर एक प्रकारचा रथ असून त्यात विराजमान असलेला आत्मा रथी आहे. अजाण बालकेही सहजपणे म्हणतात की, 'हे माझे शरीर आहे' निःसंशय माझे शरीर म्हणणारा मी आत्माच आहे. आत्माचे रूप अति सूक्ष्म ज्योतिबिंदू आहे. 'परमात्मा' (परम+आत्मा) ह्या शब्दाद्वारे आपण जाणू शकतो की, तो देखील एक आत्माच आहे. अर्थात त्याचे रूपही अति सूक्ष्म ज्योतिबिंदूच आहे.

**आत्मा व परमात्म्या मध्ये महाभिन्नता तर हीच आहे की, मनुष्य आत्मा जन्म-मृत्युच्या व सतो-रजो-तमोच्या अटल चक्रात बद्ध झाल्याने, तो काही काळ पावन तर काही काळासाठी पतित बनतो. ह्या चक्रातून श्री नारायणाचा आत्माही मुक्त होवू शकत नाही. केवळ एकमात्र परमात्माच ह्या चक्रातून मुक्त असल्याने व मानव सदृश आपला देह कधीही धारण करीत नसल्याने, तो नस नाडीच्या बंधनात येत नाही. फलस्वरूप त्याची पावनता सागराप्रमाणे सदा अमर्याद असते.** अजन्मा परमात्म्याला स्वतःचे शरीरच नसल्याने शिशु, युवा व वृद्ध ह्या तीन अवस्था त्याला स्पर्शही करु शकत नाहीत. बंधुनो, असा कोणताच काळ



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

असू शकत नाही की, ज्या काळात परमात्म्याचे अस्तित्व नव्हते. अर्थात तो सदा अमर आहे. त्याचे हे अमरत्व अनादि अनंत काळाचे असल्याने त्याला 'अकालमूर्त'' म्हटले आहे. असा अकालमूर्त व सर्वशक्तिवान परमात्मा अधिकाधिक काळ परमधाम मध्येच निवास करतो. केवळ धर्मग्लानी समयी तो ह्या साकार सृष्टीवर अवतरीत होतो. परंतु तो येथे कोठेही निवास करीत नाही. मनुष्याने मात्र आपल्या भावनिक अनुमानातून त्याला 'सर्वव्यापी' म्हटले आहे. बंधुनो, आपण आपला विवेक जागृत करावा की, परमात्मा तर अति सूक्ष्म ज्योतिकण आहे. तो कणाकणात व्याप्त असू शकेल काय? परम सत्य तर हेच आहे की, परमात्मा ना परमधामात, ना ह्या साकार सृष्टीत सर्वव्यापी आहे. वास्तविक परमात्मा अति सूक्ष्म ज्योतिर्बिन्दू व अव्यक्त असल्याने त्याला कोणीही चर्मचक्षुंनी पाहू शकत नाही. अर्थात योगाद्वारे त्याची केवळ अनुभूति प्राप्त करावयाची असते. ज्या राजयोग्याची स्थिति आत्माभिमानी आहे व जो योगसाधनेत अशरीरी बनतो तोच मनबुद्धीच्या सहाय्याने परमधाम मध्ये जावून, परमात्म अनुभूति प्राप्त करु शकतो.

धर्मग्लानी व परमात्म्याचे अवतरण ह्या दोन्हींचा घनिष्ठ संबंध असल्याने, ह्या साकार सृष्टीवर धर्मग्लानीची परिसीमा होताच परमात्म्याचे अवतरण होते. धर्मग्लानी होण्याचे कारण आहे अज्ञान व अधर्माचा प्रादुर्भाव होणे. अधर्म निर्माण होण्याचे कारण आहे. मनुष्याला स्वस्वरुपाची व स्वधर्माची विस्मृती होणे (आत्म्याचा मूळ धर्म आहे पवित्रता व शांती) ही विस्मृतीच त्याला देहाभिमानात व कामक्रोधादि विकारात बद्ध करते. फलस्वरुप सत्याला असत्य, असत्याला सत्य, धर्माला अधर्म व अधर्माला धर्म मानण्याची वृत्ती निर्माण होते. मनुष्याच्या ह्या वृत्तीनुसार त्याच्या आत्मिक स्थितीचे ज्याप्रमाणे पतन होत गेले त्याप्रमाणे भिन्न भिन्न पुराणकथा लिहिल्या गेल्या. ह्या कल्पित पुराण कथांमुळे परमात्मा व त्याच्या श्रेष्ठ रचनेची ग्लानी झाली आहे. नरश्रेष्ठ श्री नारायण अर्थात श्री विष्णुही मच्छ, कच्छ, वराह इत्यादी प्राण्यांच्या द्वारे अवतार घेतो अशी विकृत लोकमान्यता प्राप्त झाली. संपूर्ण अहिंसक व निर्विकारी देवतांनाही मनुष्य हिंसक व विकारी मानू लागला... फलस्वरूप आपल्या प्रथम पूर्वजांचा अर्थात ज्यांना कुलस्वामी व कुलस्वामिनी म्हटले जाते त्या देवी देवतांच्या गुणांचा, त्यांच्या सत्त्वप्रधान आत्मिक स्थितीचा व त्यांच्या अहिंसक वृत्तिचा जो वास्तविक आदर्श आहे, तो प्रायः लोप पावून अनादर्श निर्माण झाला. फलस्वरुप मनुष्य आत्मा पूर्णतः विचारभ्रष्ट, मर्यादाभ्रष्ट, कर्मभ्रष्ट, धर्मभ्रष्ट व पतित झाला आहे. त्याच्या पतित स्थिती मुळे ह्या कलियुगी नरकीय वातावरणात धर्मग्लानीचेही वातावरण निर्माण झाले.

**बंधुनो, ही धर्मग्लानी नष्ट करुन धर्मग्लानी मुक्त युगाची निर्मिती करण्यासाठी ह्या कलियुगाच्या अंतिम चरणात ८१ वर्षापूर्वीच पतित पावन निराकार शिव परमात्म्याचे (शंकराचे नव्हे) दिव्य अवतरण झाले आहे. मनुष्यात्म्यांना पावन स्थिती प्राप्त करवून देण्यासाठी तसेच त्याच्या मनावरील असत्याचा प्रभाव नष्ट करण्यासाठी परमात्म्याने संपूर्ण सत्यगीताज्ञान व राजयोगाची विधी प्रदान केली आहे.** इतकेच नव्हे तर त्याने मनुष्यात्म्यांच्या आदि व अनादि पवित्र स्वरुपांच्या दिव्य स्मृतिही जागृत केल्या आहेत. बंधुनो, जो परमात्मा पतित आत्म्यांना पावन बनवून त्यांची सद्गति करतो तसेच त्यांच्या जन्मजन्मांतराच्या सुखशांतीसाठी ह्याच भारतभूमीवर निर्विघ्न अशा एका सत्यधर्माची व एका सत्ययुगाची स्थापना करण्याचे महान कार्य करतो त्या सद्गति दात्याचीच मनुष्यात्म्यांना विस्मृति झाल्याने, कोट्यावधी योजने दूर असलेल्या परमधामातून ह्या साकार सृष्टीवर अवतरित होवून, अपरिचित झालेल्या परमात्म्याला स्वतःचा परिचय स्वतःच करुन द्यावा लागतो. परमात्म्याच्या अवतरणापूर्वी भिन्न भिन्न धर्मातील श्रेष्ठ मनुष्यात्म्यांनी आपल्या अनुभूतिनुसार परमात्म्याचे स्वरुप कसे आहे ते सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी वर्णन केलेले परमात्म्याचे स्वरूप ईश्वरीय ज्ञानाशी मिळते जुळते आहे. गुरू नानकजींनी म्हटले आहे 'एक ही ॐकार'. धर्मात्मा येशू ख्रिस्ताने म्हटले आहे 'God is light' इस्लाम धर्माची मान्यता आहे की, 'अल्लाह एक नूर है।' म्हणून मशिदीत त्याचे कुठलेच चित्र असत नाही. परमात्मा ज्योतिस्वरूप असल्याने हिंदू धर्मात त्याच्या प्रतिमेला 'ज्योतिर्लिंगम्' म्हटले जाते. फलस्वरूप



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

भारतातील बारा ज्योतिर्लिंगाच्या स्थानांना विशेष महत्त्व आहे. बंधुनो, एक ही ओमकार, अल्लाह एक नूर है, God is light व ज्योतिर्लिंगम् हे विभिन्न भाषेतील शब्द जरी विभिन्न असले तरी त्याचा भावार्थ एकच आहे, तो म्हणजे परमात्मा ज्योतिस्वरूप आहे. त्या ज्योतिस्वरूपाची प्रतिमा म्हणून शिवमंदिरात शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली जाते. परंतु अज्ञानामुळे शिवलिंगालाच शंकराची प्रतिमा मानून त्याचे पूजन केले जाते. चित्रात शिवलिंगा समोर शंकराला तपस्या करताना दर्शविले जाते अर्थात जो परमात्म्याची साधना करीत आहे त्या साधकालाच मनुष्याने परमात्मा मानणे हे अज्ञान नव्हे काय?

बंधुनो, ज्योतिस्वरूप परमात्म्याला श्रीराम, श्रीकृष्ण अथवा शंकरा प्रमाणे कोणतेही दैहिक रूप नसल्याने त्याची प्रतिमा निराकार शिवलिंगाच्या रूपात दर्शविली जाते. शिवलिंग म्हणजेच ईश्वराची, परमात्म्याची अथवा त्या अल्लाहची प्रतिमा आहे असे जर त्या काळात महम्मद गजनवीला कोणी समजावून सांगितले असते तर त्याने सोमनाथाचे मंदिर लुटण्याचा कट तात्काळ रद्द केला असता. ज्या शिवभक्ताने प्रथमतः शिवलिंगाची प्रतिमा मूर्तिकाराकडून बनवून घेतली असेल त्याने हे निश्चितपणे जाणले असणार की शिव परमात्मा निराकार आहे. परंतु पुढे काल प्रवाहात बहुतांश भक्तांना ह्या निराकार रुपाची यथार्थ समज न मिळाल्यामुळे शिव परमात्म्याच्या प्रतिमेलाच शंकराची प्रतिमा मानण्याचे अज्ञान निर्माण झाले असावे. त्यांनी हा विचार कधीच केला नसेल की जर शंकराला स्वतःचे शरीर आहे, तर मंदिरात त्याच्या मूर्तिची प्रतिष्ठापना का केली गेली नाही? शिवरात्रीला करोडो भक्त शिवमंदिरात जातात ते शिवाला शंकर मानूनच. फलस्वरूप ह्या मंदिरात जाण्यापूर्वी व जावून आल्यावर 'मला शंकराच्या मंदिरात जायचे आहे' तसेच 'मी शंकराच्या मंदिरात जावून आलो' अशी दोन अज्ञानयुक्त वाक्ये त्यांच्या मुखाद्वारे हमखास उच्चारली जातात. अज्ञानाची परिसीमा तर हीच आहे की, त्यांनी शिवलिंगाचा चुकीचा असा अर्थ वर्षानुवर्षे मनात ठेवला आहे.

**बंधुनो, शिवलिंग शब्दामधील लिंग शब्दाचा अर्थ आहे प्रतिमा. शिवलिंग अर्थात शिव परमात्म्याची प्रतिमा. ज्याप्रमाणे पवित्र आत्म्याच्या प्रतिमेला अर्थात शालीग्रामाला 'आत्मलिंग' म्हणतात तद्वतच शिव परमात्म्याच्या प्रतिमेला शिवलिंग म्हणतात. शिवलिंगावर बेलाची तीन पाने ह्याच कारणासाठी वाहिली जातात की तो ब्रह्मा, विष्णु व शंकराचाही रचयिता आहे. शिवाला शंकर समजणे अर्थात पित्यालाच पुत्र समजण्यासारखे आहे. आपल्या भारतात अनेक विद्वान पंडित होवून गेले परंतु शिव आणि शंकर हे भिन्न भिन्न आहेत ह्याचे यथार्थ ज्ञान कलियुगाच्या अंतिम चरणापर्यंत कोणीही दिले नव्हते. ते ज्ञान केवळ शिव परमात्म्याच्या अवतरणानंतरच मनुष्यात्म्यांना प्राप्त होते.**

परमात्म्याचा यथार्थ परिचय नसतानाही बहुतांश भक्तांचे अनुमान आहे की, त्या परमात्माकडे जाण्याचे अनेक मार्ग असले तरी सर्व मार्ग त्याच्या कडेच घेवून जाणारे आहेत. फलस्वरूप ते भिन्न भिन्न उपासनेच्या मार्गाने परमात्म्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांचा असाही गैरसमज आहे की, इष्ट देवतेचा साक्षात्कार झाला की, त्या साक्षात्काराच्या रूपात परमात्म्याला प्राप्त केल्या सारखे आहे. परंतु 'साक्षात्कार म्हणजे परमात्म प्राप्ती नव्हे' हे त्यांच्या बुद्धीत न आल्याने अद्याप त्याच्याकडे जाण्याचा जो अंतिम महामार्ग आहे तोही त्यांच्या दृष्टिक्षेपात आलेला नाही. अशा भक्तजनांसाठी अत्यानंदाचा समाचार आहे की, ज्याची तुम्ही जन्मजन्मांतर प्रतिक्षा करीत आहात तो निराकार सद्गुरू परमात्मा ह्या साकार सृष्टीवर कधीच अवतरित झाला आहे. त्याने प्रजापिता ब्रह्माच्या मुखाद्वारे उच्चारलेल्या अनेक महावाक्यात सर्वाधिक कल्याणकारी महावाक्य हेच आहे की, ''जन्मजन्मांतर तुम्ही केलेल्या भक्तीचे फळ देण्यासाठी मी परमात्मा अवतरित झालो आहे. अर्थात हे फळ आहे सद्गुरु परमात्म्याने प्रदान केलेले मुक्ती - जीवनमुक्तीचे ज्ञान व राजयोग!'' परमात्म ज्ञानाद्वारे अल्पकाळात प्राप्ती व्हावी म्हणून त्याने हा राजयोगाचा महामार्ग निर्माण केला आहे. परंतु हा महामार्ग त्याच वेळी दृष्टीक्षेपात येईल ज्यावेळी बुद्धिरूपी स्वीच ऑन होवून भक्ताच्या अंतर आत्म्यात हा प्रकाश पडेल की, जर

(पान २२ वर)



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

# ईश्वरीय कार्य व्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

**दिवंगत वरिष्ठ भ्राता रमेश शाह, (मुंबई) यांच्या लेखणीतून**

ईश्वरीय कार्यव्यवहारामध्ये संपन्नता आणण्याच्या अशा आदर्श व्यवस्थेबाबत आजवर लेख शृंखला लिहिली आहे. त्या संदर्भात पिताश्री ब्रह्माबाबांकडून वेळोवेळी मला जे मार्गदर्शन मिळाले त्याबाबत अनुभवासहित मी माझे विचार आपल्यापुढे मांडत आहे.

१९६८ सालच्या नोव्हेंबरमध्ये, मी जेव्हा ट्रस्टच्या मॅनेजिंग ट्रस्टीच्या रूपात कारभार स्वीकार केला तेव्हा मी ब्रह्माबाबांना म्हटले की, मला मॅनेजिंग ट्रस्टी म्हणून कार्य करण्याचा अनुभव नाही. म्हणून याबाबत मला आपल्याकडून मार्गदर्शन मिळायला हवे. नंतर एका पत्रात बाबांनी लिहिले की, आपल्या बुद्धीची लाइन क्लिअर ठेवा म्हणजे बाबा टचिंगद्वारा (प्रेरणेद्वारा) मार्गदर्शन देतील. अर्थात बुद्धीची लाइन सदैव क्लिअर ठेवणे, अत्यंत गरजेचे आहे. ही गोष्ट मला बाबांच्या पत्रातून स्पष्ट झाली.

दादा विश्वरतन यांचे बॉम्बे हॉस्पिटलमध्ये जेव्हा ऑपरेशन झाले होते तेव्हा त्यांना तीव्र वेदनांमुळे रात्री झोप येत नव्हती. त्यावेळी ब्रह्माबाबांनी रात्रभर जागून त्यांना स्वस्थ वाटावे म्हणून सकाश (शक्ती) दिली होती, जेणेकरून त्यांना चांगली झोप यावी. या उदाहरणाच्या आधारे मी समजलो होतो की, ज्या पद्धतीने बाबांनी दादा विश्वकिशोर यांना सकाश देऊन, झोपेचा अनुभव करवला त्याच पद्धतीने बाबा मला सुद्धा ट्रस्टच्या कार्य व्यवहारात प्रेरणा देतील आणि मदतही करतील. मात्र त्यावेळेस मला जरा सुद्धा कल्पना नव्हती की लवकरच बाबांचा अव्यक्त पार्ट सुरु होईल. वास्तविक त्या संदर्भात बाबा वेळोवेळी इशारा देत होते पण तरीही ब्रह्माबाबा लवकर अव्यक्त होऊ शकतात, याची कल्पनासुद्धा आली नाही.

अव्यक्त होण्याबाबत साकार बाबांनी अनेकांना गुप्त इशारा दिला होता. सन १९६८ मध्ये जेव्हा एक भाऊ आपल्या व्यवहाराच्या संदर्भात बाबांशी बोलण्यासाठी आला होता तेव्हा माझ्या समोरच बाबा त्याला म्हणाले होते की, माझ्याशी तुझा संपर्क होवो किंवा न होवो, परंतु या रमेश बच्चाबरोबर जरुर संपर्क कर आणि त्याच्या मार्गदर्शनानुसार वाटचाल कर. असेच समज की, जणू मीच मार्गदर्शन दिले आहे. त्यावेळेस असे वाटले की, बाबा व्यस्त असल्यामुळे त्यांना पत्रव्यवहार करणे जमत नसेल. म्हणून त्यांनी मला हे काम दिले असावे. परंतु बाबांनी तो इशारा दिला होता, जो मी समजू शकलो नाही. कारण त्यावेळी आम्हा सर्वांना पूर्ण विश्वास होता की ब्रह्माबाबा शेवटपर्यंत आमच्या सोबत राहतील.

बुद्धीची लाइन क्लिअर ठेवण्या संदर्भात मला एक प्रसंग आठवतो. सन १९७१ मध्ये आम्ही जेव्हा विदेश दौऱ्यावर गेलो होतो. त्यावेळेस अव्यक्त बापदादांनी आम्हाला सांगितले होते की, परदेशात असताना तुम्ही जेव्हा जेव्हा सेवार्थ बाहेर पडाल तेव्हा पाच मिनिट बाबांच्या आठवणीत बसून, मगच निघा; जेणेकरून बाबांना शेवटच्या क्षणी काही टचिंग करायची असेल तर करता येईल. खरोखर तसेच झाले. आम्ही एका प्रदर्शनसाठी निघालो होतो. लिफ्टने आम्ही खाली उतरलो आणि लक्षात आले की निघण्यापूर्वी ५ मिनीट बाबांच्या आठवणीत आपण बसलो नाही. म्हणून पुन्हा वर गेलो व बाबांच्या आठवणीत बसलो. आमच्या बरोबर शील बहेनजी होत्या, ज्या संदेशी होत्या. त्याच पाच मिनिटाच्या अवधीत बाबांनी शील बहेनजीला सूक्ष्मवतनमध्ये आपल्या जवळ बोलाविले अन् सांगितले की, तुम्ही पूर्ण तयारीनिशी जात नाहीत. मुख्य पाहुण्यांद्वारे जे दीप प्रज्वलन होणार आहे त्यासाठी लागणारी काडीपेटी तुम्ही बरोबर घेतलेली नाही. म्हणून बाबांनी तुम्हाला



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

'टच' करून मागे बोलाविले. आम्ही पाहिले की जी सामुग्री आम्ही घेऊन चाललो होतो, त्यात नेमकी काडीपेटी नव्हती. त्याविना दीप प्रज्ज्वलन खोळंबले असते व समस्या उद्‌भवली असती.

दुसरे असे उदाहरण, मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्टेशन समोरील क्रॉस मैदानावर आयोजित आध्यात्मिक मेळ्याचे उद्‌घाटन करण्यासाठी गुजरातचे गव्हर्नर आले होते. त्यांनी उद्‌घाटनाची फीत तर कापली. परंतु त्यानंतर होणाऱ्या दीप प्रज्ज्वलनासाठी कुणाकडेच काडीपेटी नव्हती. तेव्हा गव्हर्नर म्हणाले की, तुमच्या येथे कुणी सिगारेट नाही का ओढीत? त्यावर मी म्हणालो की, नाही-नाही! आमच्याकडे कुणीही सिगारेट ओढत नाही. त्यावर गव्हर्नर साहेबांना खूप आश्चर्य वाटले. तेवढ्यात एक भाऊ पळत पळत चर्चगेट स्टेशनला जाऊन काडीपेटी घेऊन आला आणि त्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले. या सर्व गोष्टीत १०-१५ मिनिटे फुकट गेली. अशा प्रकारे सेवेच्या नियोजनात लहान-सहान बाबींना सुद्धा खूप महत्त्व आहे.

मी सदैव याबाबतीत दक्ष राहतो की, जेणेकरून माझी बुद्धीची लाइन क्लिअर राहिल. या संदर्भात आणखी एक गोष्ट मला आठवते. एकदा बॉम्बे हॉस्पिटलमध्ये माझे ऑपरेशन झाले होते. ३-४ दिवसानंतर मला तीव्र वेदना सुरु झाल्या. या वेदना दुपारी १ वाजेपर्यंत सतत सुरु होत्या. म्हणून माझ्या लौकिक माताजींनी शील दादींना बोलावून घेतले. शीलदादी हॉस्पिटलमध्ये आल्या आणि मला वेदनेने विव्हळतांना पाहून, त्या ध्यानावस्थेत सूक्ष्मवतनमध्ये गेल्या. तेथे त्यांनी बाबांना सांगितले की, रमेश भाईंना खूप त्रास होत आहे. त्यावर बाबांनी सांगितले की, तुम्हा मुलांची बुद्धीची लाईन क्लिअर असायला हवी. ती क्लिअर नसल्याने मी केव्हापासून वाट पहातोय की कधी बुद्धीची लाइन क्लिअर असेल आणि मी 'टच' करून रमेश बच्चासाठी औषध सांगेन.

**तात्पर्य म्हणजे जेव्हा समस्या येतात तेव्हा बुद्धीची लाइन क्लिअर नसते. अशावेळी आपण कार्यव्यवहारत इतके व्यस्त होऊन जातो की त्यामुळे बुद्धीची लाइन क्लिअर रहात नाही. परिणामतः बाबांकडून आवश्यक ते 'टचिंग' मिळत नाही व समस्या निवारण न होता, समस्याच होऊन राहते. त्यात खूप वेळ व शक्ती नष्ट होते.**

सेवाकेंद्राच्या सर्व टीचर्स बहिणींना माझे निवेदन आहे की, बुद्धीची लाइन क्लिअर कशी राहिल या विषयावर क्लासेस करावेत. त्यामुळे सतत बाबांशी बुद्धी जुळलेली राहिल. बाबांशी बुद्धी सतत जोडलेली राहिल्यानेच बाबांची मदत मिळत राहिल. फलस्वरूप समस्यारुपी पहाड राईसारखा व राईपासून कापसासारखा (रुई) बनून राहिल.

आता या संदर्भात असा एक प्रश्न उद्‌भवतो की, आता तर संगमयुगात शिवबाबा आहेत त्यामुळे ते प्रेरणेद्वारे आपल्या मुलांना मार्गदर्शन देत राहतील. परंतु सत्ययुगातील कारभार कसा चालेल? तेथे आपण आत्मेच असणार आहोत. तेव्हा आम्हा आत्म्यांकडून शिवबाबा प्रेरणा देऊन कसे काय श्रेष्ठ कर्म करुन घेतील? याचे उत्तर सरळ सोपे आहे. उदाहरणार्थ जसे आजकाल बहुतांश जण मोबाईलचा उपयोग करीत आहेत. प्रत्येक जण बाहेर जाण्यापूर्वी मोबाईलची बॅटरी चार्ज करून घेतो. बॅटरी चार्ज असेल तर आपण मोबाईल कुठेही नेऊ शकतो व त्याचा वापर करु शकतो. त्याप्रमाणे संगमयुगात शिवबाबांकडून प्राप्त शक्तीद्वारे आपण आपल्या आत्म्याच्या बॅटरीला चार्ज करीत आहोत. ही शक्ती आपल्याला सत्ययुग व त्रेतायुगातील कार्यव्यवहारात उपयोगास येईल. संगमयुगात एकदा का ही शक्ती भरली की त्याद्वारे आपण सर्व समस्यांचे निवारण करु शकतो.

गीतेमधील वर्णित अर्जुनाप्रमाणे आपली स्थिती नाही, जो लढावे की लढू नये या द्विधा मनस्थितीत होता. तसेच शेक्सपियरच्या नाटकातील हॅम्लेटसारखी ही नाही, जो या द्विधा अवस्थेत होता की - To do or not to do. To be or not to be. परंतु शिवबाबांनी आपल्याला जी आत्मिक शक्ती दिली आहे तिच्या आधारे आपल्यात योग्य निर्णय घेऊन, योग्य कार्य करण्याची शक्ती येऊ लागते. योगाची सरळ परिभाषा आहे - आत्म्याची बॅटरी चार्ज करणे! चार्ज झालेल्या बॅटरीद्वारे पुढची कामे केली जाऊ शकतात. सत्ययुगात परमात्म्याने दिलेल्या ज्ञानाची स्मृती आपल्याला रहात नाही. परंतु त्या ज्ञानामुळे उत्पन्न झालेले श्रेष्ठ संस्कार जरुर राहतील.



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

आत्मा हा मन-बुद्धी-संस्कार सहित आहे. परमात्म शक्तीद्वारे आता आपल्यामध्ये श्रेष्ठ संस्कार भरले जात आहेत.

अनेकदा असे होते की बॅटरी चार्ज करायला ठेवली जाते. परंतु वास्तवात बॅटरीच्या चार्जरशी नीट संपर्कच झालेला नसतो. अगदी त्याप्रमाणे काही जण लिहिलेले हे लेख वाचून बाजूला ठेऊन देतात आणि आपल्या संस्कारामध्ये या आवश्यक गोष्टींना उतरविण्याचा प्रयत्नच करीत नाहीत. तर काहीजण या लेखमालेला अभ्यासून, साकार - निराकार द्वारा शिकविल्या गेलेल्या गोष्टींना संस्काराचे रुप देऊन, आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात. आपल्या बॅटरीला आपण ज्ञान - योगाने किती चार्ज करतो हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे. तसेच आपल्या मनबुद्धीची लाइन किती क्लिअर ठेवतो हे सुद्धा! मन-बुद्धीची लाइन क्लिअर ठेवणे हे केवळ संगमयुगा पुरतेच फायद्याचे नसून, त्याचे संस्कारात रुपांतर होऊन ते पुढे सत्ययुग व त्रेतायुगातील श्रेष्ठ कार्यव्यवहाराचा आधार बनतील.

आशा आहे की सर्व भाऊ - बहिणी आपल्या बॅटरीला ईश्वरीय शक्तींद्वारे चार्ज करतील तेव्हाच आपल्याला श्रेष्ठ मार्गदर्शन मिळू शकेल. तसेच आपल्या माध्यमातून विश्वाच्या कारभारालाही लाभ होईल. वास्तविक ज्ञान व योगाचे फळ हेच आहे. परंतु त्याचा यथार्थ उपयोग करण्यासाठी आपल्या मनबुद्धीची लाइन क्लिअर असायला हवी. म्हणूनच 'आपण आपल्या संस्कारांना सत्त्वप्रधान बनवावे, जेणे करून सत्ययुग - त्रेतायुगाचा कार्यव्यवहार आपण श्रेष्ठत्वाने करू शकू.

**दादी जानकीजी नेहमी म्हणतात की लहान गोष्टींना मोठं करणं किंवा मोठ्या गोष्टींना लहान करणं, हे आपल्या हातात आहे.** सर्व भाऊ - बहिणी मात्र लहान गोष्टींना मोठं करण्यात जास्त हुशार आहेत. एखादी गोष्ट पाहून असे गोंधळून जातात की त्यामुळे वेळेची बरबादी होते. तसेच योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यासाठी शिवबाबांकडून मिळणाऱ्या मदतीपासून आपण वंचित होतो. म्हणून दादीजींकडून हे शिकण्यासारखे आहे की, आपण छोट्या गोष्टींना मोठे स्वरूप देऊ नये. म्हणजेच राईचा पर्वत करु नये. त्याचबरोबर कार्य करतांना बाबांशी मनबुद्धीची लाइन क्लिअर ठेवावी, जेणेकरून अव्यक्त बापदादांची टचिंग आपल्याला मिळू शकेल. सदैव लक्षात ठेवावे की कुठलेही कार्य सफल करणे, हे आपल्याच हातात आहे. त्याचा आधार आहे आपली क्लीन (स्वच्छ) व क्लिअर (स्पष्ट) बुद्धी!

**संकल्प - विकल्पांच्या जंगलात न भरकटता आपली सर्वांची बुद्धी क्लिअर रहावी आणि अव्यक्त बापदादांकडून वेळोवेळी प्रेरणा मिळत रहावी व आपले कार्य सफलतापूर्वक संपन्न व्हावे, या दृष्टीनेच सदरचा लेख लिहिला गेला आहे.**

**(भावानुवाद :**<br>**बी. के. जयश्री खिलारी,**<br>**विक्रोळी, मुंबई)**

***



## तपस्विनी, अथक सेवाधारी ब्र. कु. मंगला दीदींना भावपूर्ण श्रद्धांजली

ब्र. कु. मंगला दीदी या सध्या वाशीम सेवाकेंद्रावर सेवारत होत्या. यापूर्वी त्यांनी खामगाव, नांदुरा, कामठी उमरेड, अकोला, मालेगाव इत्यादी ठिकाणी ईश्वरीय सेवा केली होती. वाशीमला तीन सेवाकेंद्रे व दहा गीता पाठशाळा सुरु करण्यासाठी त्या निमित्त बनल्या. मंगला दीदी मागील ३३ वर्षापासून ईश्वरीय सेवेत समर्पित होत्या. त्या त्यागी, तपस्विनी व अथक सेवाधारी होत्या. त्या मागील काही वर्षापासून कॅन्सरने आजारी होत्या. तरी ईश्वरीय सेवेत त्यांनी खंड पडू दिला नाही. शेवटी त्या वाशीम क्रिटीकल सेंटरवर ॲडमिट होत्या. **त्यांनी दि. ३० नोव्हेंबर २०१७ रोजी (वयाच्या ४९ व्या वर्षी) अमृतवेलेवर, आपल्या कर्माचा हिशोब संपवून, नश्वर देहाचा त्याग केला व त्या बापदादांच्या गोदीत विसावल्या. अशा महान आत्म्यास सर्व ब्राह्मण परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली समर्पित करण्यात येत आहे.**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# राजयोग व संकल्प शक्तीचा जल प्रयोग

**ब्र. कु. चंद्रशेखर, शांतिवन, आबू रोड**

भारताचा प्राचीन राजयोग विश्व-विख्यात आहे म्हणूनच भारताला विश्वाचा धर्मगुरु म्हटले जाते. राजयोग हा स्वयं परमात्मा शिव पित्याने शिकवला असून, त्याद्वारे मनुष्याला आत्मा, परमात्मा व सृष्टिचक्राचे सत्य ज्ञान प्राप्त होते व राजयोगाच्या अभ्यासाने मनुष्य देवता बनतो. राजयोग आपल्या आंतरिक सुप्त शक्तींना जागृत करतो व सर्व विकारांना नष्ट करून, आपल्याला संपूर्ण पवित्र बनवतो. राजयोगाच्या माध्यमाने आपण आपल्या घराला मंदिरासमान बनवू शकतो जेथे रहाणाऱ्या सर्वांचे दैवी संस्कार असतील. **या विश्वाला श्रेष्ठ बनविण्यात राजयोगाची अहम भूमिका आहे. राजयोग विश्व परिवर्तनाचा आधार आहे. राजयोगाच्या अभ्यासाने आपण आपल्या शुद्ध मनोकामना पूर्ण करू शकतो.** म्हणूनच राजयोगीसाठी म्हटले जाते. 'संसार की कोई भी वस्तु अप्राप्त नही, सब कुछ संभव और सहज है।' राजयोगीच्या केवळ आवाहनाने सर्व गुण व शक्ती त्याच्यासमोर उपस्थित होतात.

**संकल्प शक्तीचा पाण्यावर पडणारा प्रभाव -**

'संकल्प शक्तीचा पाण्यावर पडणारा प्रभाव' याविषयी शांतिवनमधील ब्रह्मावत्सांचा एक ग्रुप मागील ८ वर्षापासून नियमितपणे प्रयोग करीत आहे. तसेच या प्रयोगाद्वारे हजारो आत्म्यांनी लाभ घेतला आहे. आता आपण याबाबत थोडक्यात जाणून घेऊ या.

आपण हे जाणतो की सन २०१४ मध्ये आदरणीय दादी जानकीजींची तब्बेत खूपच खराब झाली होती. त्यावेळी दादीजींना सुमारे दोन महिने राजयोग व संकल्प शक्तीच्या प्रयोगाद्वारे शुभभावनायुक्त जल देण्यात आले होते. त्या दरम्यान **प्राणेश्वर बापदादांनी दादीजींसाठी पुढील संदेश पाठविला होता - 'बाबा के कमरे मे आधा घण्टा कोई भी योगमें बैठे, सामने जल रखे और बच्ची को यह जल बीच-बीच में पिलाते रहो, तो देह को राहत मिलेगी।' या जल प्रयोगाद्वारे दादीजींच्या स्वास्थ्यात बरीच सुधारणा झाली होती.**

शांतिवनमधील ब्रह्मावत्सांचा एक ग्रुप रोज रात्री ९ ते १० वाजेपर्यंत बाबांच्या कमऱ्यात संघटित रुपात, अशाप्रकारचा जलप्रयोग नियमितपणे करतो. रात्रीच्या वेळी हा जलप्रयोग करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे **शिवबाबांचे श्रीमत आहे की रात्री झोपण्यापूर्वी किमान ३० मिनिट योग केल्यानंतर बाबांच्या गोदीत विश्राम करा. याचवेळी जर आपण पाण्यावर बाबांची याद व संकल्प रात्रीचा प्रतिदिन प्रयोग केला तर आपल्याला डबल फायदा होतो. हे जल पिण्याने शारीरिक आजारातून मुक्त होण्यासाठी बाबांची मदत मिळते.** त्याचबरोबर सूक्ष्म आभामंडल निर्माण होते जे आपले सुरक्षा कवच बनते. परिणामतः अशुद्ध वायब्रेशन (प्रकंपन) पासून आपली रक्षा होते व झोप चांगली लागते. मुख्य म्हणजे अमृतवेळेला योगाच्या समयी श्रेष्ठ अनुभूती करण्यासाठी मदतही मिळते. अशाप्रकारे आपले श्रेष्ठ व समर्थ संकल्प हे संजीवनी बूटीचे कार्य करतात. ज्याचा प्रभाव प्रकृतीच्या ५ तत्त्वांवर, आत्म्यावर तसेच वातावरणारवर सुद्धा पडतो.

आपण हे जाणतो की, पाण्यामध्ये वायब्रेशन ग्रहण करण्याची शक्ती खूपच अधिक आहे. त्यामुळे राजयोगाचा अभ्यास व श्रेष्ठ संकल्पांच्या शक्तीने निर्मित जल पाजून, मनुष्यात्मांना अनेक समस्यांपासून मुक्त करता येऊ शकते. आपले संकल्प आशीर्वाद बनून, सर्वांचे दुःख-दर्द दूर करु शकतात.

**ईश्वरीय वायब्रेशनाद्वारे निर्मित जल अनेक समस्यातून मुक्त करते -**

जो साधक सर्व समस्यातून मुक्त होण्याची कामना करीत असेल त्याने



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

एका निश्चित समयी व निश्चित स्थानी बसून, किमान २० ते ३० मिनिटे राजयोगाच्या अभ्यासाद्वारे परमात्म शक्ती व पवित्रतेचे श्रेष्ठ वायब्रेशन समोर ठेवलेल्या पाण्यात प्रवाहित करावे. हे जल अमृतमय होत आहे, असा अनुभव करावा. **अशाप्रकारे ईश्वरीय वायब्रेशनद्वारे निर्मित जल, आपण ज्या आत्म्याला पिण्यासाठी देऊ, त्या आत्म्याच्या शारीरिक व मानसिक समस्या समाप्त करण्यासाठी अतिशय मदतगार सिद्ध होईल. त्यामुळे प्रत्येक ब्रह्मावत्साने सदरचा प्रयोग अवश्य करावा. तसेच स्वतःचे व इतरांचे जीवन अमृतमय बनवावे.** त्याचबरोबर ज्यांना शक्य आहे त्यांनी प्रत्येक वेळी अन्न सेवन करतांना तसेच पाणी ग्रहण करतांना, त्यात ईश्वरीय शक्ती व पवित्रतेची श्रेष्ठ वायब्रेशन भरण्याचा पुरुषार्थ करावा म्हणजे प्रकृती व पुरुष (आत्मा) दोन्ही झपाट्याने पावन बनत असल्याचा अनुभव येईल.

बहुतांशी सर्व ब्रह्मावत्स भोजनाचा भोग लावतात. परंतु ब्रह्माभोजन सेवन करतांना प्रत्येक घासागणिक शिवबाबांची आठवण करायला मात्र विसरतात. खरं तर शिवबाबांच्या मधुर स्मृतीत अन्न व जल ग्रहण करणे, अत्यंत महत्त्वाचे आहे. (याचेच प्रतीक म्हणून भक्तिमार्गात 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' असे समर्थ रामदासांनी देखील सांगितले आहे.) म्हणूनच कित्येक महारथी खाता-पितांना मौन पाळतात; जेणेकरून शिवबाबांच्या स्मृतीत कुठलाही व्यत्यय येऊ नये. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. तसेच स्वपरिवर्तनाची सहज विधी देखील आहे.

**जल प्रयोग करण्यासाठी आवश्यक धारणा व होणारा लाभ –**

राजयोग व संकल्प शक्ती युक्त जल बनविण्यासाठी खाली नमूद केलेल्या धारणा आवश्यक आहेत.

१) पवित्रता जितकी चांगली असेल, परिणाम तितकेच श्रेष्ठ असतील. कारण पवित्रता ही सुख-शांतीची जननी आहे. तसेच पवित्र आत्माच पाण्याला अमृतमय बनवू शकते.

२) नियमितपणे ज्ञान-स्नान अर्थात परमात्म्याची महावाक्ये (मुरली) ऐका अथवा वाचा.

३) सर्व आत्म्यांना अंतःकरणापासून आशीर्वाद द्या.

४) मन सदैव शुभभावनांनी भरपूर ठेवा.

५) सदा सर्वांच्या केवळ विशेषता पाहा.

६) व्यर्थ व नकारात्मक गोष्टी कधी स्वतः ऐकू नका व दुसऱ्यांनाही ऐकवू नका.

ज्यांच्या या धारणा असतील त्यांना या जल प्रयोगात अवश्य सफलता प्राप्त होईल व अनेक लाभ होतील. **सारांशाने शारीरिक व मानसिक आजार बरे होण्यास मदत होईल. संबंधात मधुरता स्थापित होईल. मनावर नियंत्रण प्राप्त होईल, कर्मेंद्रियजीत व प्रकृतिजीत बनण्यासाठी सहाय्यक ठरेल,** तंत्र-मंत्राच्या प्रभावातून मुक्त व्हाल. आत्मिक शुभभावनाद्वारे दुसऱ्यांचे दुःख कमी करू शकाल. घरातील वातावरणाचे शुद्धीकरण होत जाईल. अन्य कुठल्याही प्रकारच्या समस्येतून सहजच मुक्त होता येईल. त्यामुळे प्रत्येकाने थोडक्यात असे म्हणता येईल- हा जलप्रयोग अवश्य करून पाहा.

**योगाचे प्रयोग जीवनी, आपुल्या करु या । संपूर्णतेचे लक्ष्य सत्वरी सारे गावू या ।।**

**(आधार :** स्पार्क विंग द्वारे प्रकाशित पुस्तक 'राजयोग और संकल्प शक्तीका जल प्रयोग')

***

**तपस्या अर्थात शिवबाबांशी मीलनाची मौज अनुभव करणे होय. मीलनाची मौज अर्थात सर्व प्राप्तींची मौज, समीपतेच्या अनुभवाची मौज, समान स्थितीची मौज होय. त्यामुळे तपस्या हाच सर्वात मोठा समारंभ आहे. तपस्येचे वातावरण वाणीच्या (सेवेच्या) समारंभापेक्षा अधिक आत्म्यांना शिवबाबांकडे आकर्षित करते. तपस्या ही आत्म्यांसाठी चुंबक आहे. ती आत्म्यांना शांती व शक्तीचा दुरून सुद्धा अनुभव करवते. तसेच तपस्या आपल्या मनसा, वाचा व कर्माणामध्ये नवीनता आणते. आपली मनसा संकल्प शक्ती वाढते, वाणीत मधुरता, संतुष्टता व सरळता येते. प्रत्येक कर्मात स्वतःला व दुसऱ्याला प्राप्तीचा अनुभव होतो.**

**– आ. दादी गुलजारजी**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

# सचित्र सेवावृत्त




सोनगढ़ – 'मेरा भारत स्वर्णिम भारत' अभियानाचे स्वागत करतांना पोलिस अधिकारी भ्राता यशवंतजी व ब्र. कु. शुभदा बहेन.



मेहकर – बालाजी मंदिरचे अध्यक्ष श्री. दीपक पांडे यांनी आध्यात्मिक प्रदर्शनीचे उद्‌घाटन केल्यानंतर, त्यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. मीरा बहेन.



अकलूज – मा. भ्राता रंजनभाऊ गिरमे यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. शिवरात्री व दुर्गा बहेन, शेजारी ब्र. कु. उत्तम भाई व अन्य.



श्रीरामपूर – 'व्हॅल्यू इन हेल्थ केअर' या कार्यक्रमा अंतर्गत भाषण करतांना ब्र. कु. डॉ. सचिन परब, शेजारी डॉ. मनोज मतनानी, डॉ. रविंद्र कुटे, ब्र. कु. मंदा बहेन व अन्य




डोंबिवली – युथ फेस्टिवल 'तरंग' या कार्यक्रमात विजेत्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. त्याप्रसंगी ग्रुप फोटोत ब्र.कु. शकुदीदी, भ्राता राजकुमार कोल्हे व अन्य



मलकापूर – 'देशाचा आधारस्तंभ युवा' या विषयावर प्रबोधन करतांना ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

# सचित्र सेवावृत्त



संगमनेर – नवनिर्वाचित सरपंच वंदना गुंजाळ, उपसभापती श्री अरगडे व अन्य सदस्य यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. भारती व पद्मा बहेन तसेच डॉ. योगिनी.



भंडारारोड (वरठी) – 'तणावमुक्त जीवन' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना जिल्हाधिकारी श्री. दिवसे, डॉ. प्रभा मिश्रा बहेन, ब्र. कु. उषा, प्रेमलता व ललीता बहेन.



महाड – महिला गट अध्यक्षा सौ. तपकीरे यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर, भेटवस्तू देतांना ब्र. कु. कांचन बहेन.



शाहुवाडी (कोल्हापूर) – नैतिक मूल्यांविषयीचे शिबीर झाल्यावर, सर्टिफिकेट वाटपानंतर कॅप्टन श्री. जाधव यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन.



कोंढा – 'तणावमुक्त जीवन' या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी ब्र. कु. उषा बहेन, ब्र. कु. डॉ. प्रक्षा मिश्रा, श्री. मक्कड व अन्य मान्यवर.



उदगीर – मा. जस्टीस श्री. कासद यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. महानंदा दीदी, ब्र. कु. दत्तात्रय भाई (शांतिवन) व ब्र. कु. ज्ञानसागर भाई.



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# अंतर्मुखी – सदा सुखी

## ब्र. कु. हेमंत भाई, शांतिवन, आबू रोड

एक सुफी संत होती राबिया. लोकांना सदैव मंगल, मार्मिक, भले उपदेश देत असे. परंतु जगाची तऱ्हाच निराळी. मोफत मिळालेला सल्ला कुणाला पटतो! लोक तिच्या हितोपदेशाची नेहमी हेटाळणी करीत. एके दिवशी विचार करुन तिनं मनात योजना बनविली. झोपडीच्या दाराशी बसून ती कपडे शिवू लागली. सुर्य अस्ताला चालला होता. राबिया मात्र कामात मग्न होती. येणारे जाणारे कुतुहलाने तिला विचारीत, ''राबिया, काय करतेय?'' राबिया उत्तर देई, ''कपडे शिवतेय.'' काही वेळानंतर हातातून सुई पडली. हरवलेली सुई शोधता शोधता ती रस्त्यावर आली. येणारे जाणारे विचारू लागले, ''राबिया, काय शोधतेयं?'' राबिया म्हणाली, ''सुई शोधतेय.'' सहानुभूति दाखवत लोक सुई शोधण्यासाठी तिला मदद करू लागले. अंधारही बराच झाला होता. म्हणून एक शहाणा झोपडीत जाऊन पणती घेऊन आला व राबियाला म्हणाला, ''राबिया आपण उजेडात सुई शोधूया, आता सांग बरं सुई नेमकी कुठे हरवली?'' भोळ्यापणानं ती उत्तरली, ''सुई तर आत हरवली.'' तीचे हे उत्तर ऐकून एक जण रागारागाने ओरडला, ''वेंधळीच दिसते, नसतां वेळ वाया घालवला, चांगलच मूर्ख बनवलं, वेडी कुठली!'' परंतु राबियावर मात्र त्याचा काहीच परिणाम झाला नाही. उलट शांतपणे हसत-हसत राबिया म्हणाली, ''वेडी मी नव्हे, तुम्ही आहात, माझी सुई ना आत हरवली ना बाहेर. पहिल्यांदा हे सांगा बर आत हरविलेली वस्तु बाहेर कशी मिळेल? ती तर आतच मिळेल ना! तर मग अंतरात हरवलेली सुख-शांती बाह्य भौतिक जगात कशी सापडेल? अंतर्मुखी होऊनच अंतरजगात सुख शांतीचा शोध घेतल्याने मिळेल.'' तुम्हाला हेच सांगायचा मी प्रयत्न करत असते. परंतु तुम्ही माझ्या उपदेशाकडे दुर्लक्ष करता म्हणून मी सुई शोधायचं नाटक केल. ही तुम्हाला समजविण्यासाठी तर निव्वळ युक्ती होती.

खरे तर आत्मिक सुख व मानसिक शांती ह्या पैशाने विकत घेतल्या जाणाऱ्या स्थूल वस्तू नव्हेत. त्यांच्या प्राप्तीसाठी अंतःकरणाच्या खोल डोहात उतरावे लागेल. एखादा पाणबुड्या (गोताखोर) अथांग समुद्राच्या तळाशी खोलवर उतरतो अन् मुठीत मोती घेऊन बाहेर येतो. परंतु जो फक्त सागराच्या लहरींवर वरवर पोहतो, तो अल्पकाळाची मौज अनुभवतो. पण त्यास अनमोल रत्न संपदा मिळत नाही. किती मोठं आश्चर्य? आजचा मानव संसार सागराच्या भौतिक भोगांच्या अल्पसुखदाई लहरींमध्ये पोहतो व बाह्यमुखी होऊन भौतिक जगात आनंद, संतोष, तृप्ती, शांती सारख्या आत्मिक प्राप्तींचा शोध घेतो. जोपर्यंत स्थूल नेत्र मिटून, अंतराच्या अनंत सागरात अंतर्मुखी होऊन पाणबुड्या सारखा बुडणार नाही तोपर्यंत आत्मसुख व मानसिक शांतीचा अनमोल खजिना हाती लागणार नाही. कारण ह्या सर्व प्राप्ती अध्यात्माच्या अदृश्य विश्वातच होतात. त्यासाठी व्यक्तीला आत्मचिंतन वा मनन मंथन करणं आवश्यक आहे आणि त्याचा एकमेव उपाय आहे अंतर्मुखता.

**अंतर्मुखता म्हणजे मनरुपी मुखाला अंतरआत्म्याकडे वळविणे, ज्ञानाचे मनन, व आत्मिक गुणांचे चिंतन करून आत्म्याच्या दिव्य गुणांचा अनुभव करणे होय. उचित व कामाचे बोलून वाणीला विराम देणे व आत्म्याचा मूळ गुण शांतीत स्थित होणे अंतर्मुखता होय.** परंतु ह्या उलट गरजेपेक्षा अधिक बोलण्यास फुकटची बडबड म्हटले जाते. ज्यामुळे व्यक्तिची छबी खराब होते. अशा व्यक्तीला सर्व टाळू इच्छितात. परंतु जो सारयुक्त गोड शब्द बोलतो, जो मितभाषी म्हणजे



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

केवळ कामाचेच बोलतो, तो सर्वांचा आवडता बनतो. म्हणजेच आवश्यक बोलून शांत राहणारा, सर्वांच्या हृदयावर राज्य करतो. खरे तर अंतर्मुखी बनल्याने मन आत्मिक गुणांच्या चिंतनात मग्न होऊ लागते आणि आंतरिक सौंदर्य टिपण्यात मग्न होते. त्यामुळे मनुष्य बाह्य आकर्षणापासून मुक्त होतो. मनपक्षी आवाजाच्या दुनियेपासून दूर उडू लागतो व शांतीचा गहन अनुभव करतो आणि सुखाचा स्वाद चाखतो. म्हणूनच म्हटलं जातं 'अंतर्मुखी सदा सुखी.'

अंतर्मुखी मनुष्य वाणीचा दुरुपयोग नव्हे, सदुपयोग करतो. ज्यामुळे गरजेपेक्षा जास्त बोलण्याची सवय सुटते. असा मनुष्य नेहमी शांत राहतो ज्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर नेहमी प्रसन्नता प्रकट होत असते. कारण केवळ कामाचाच विचार करण्याची सवय त्यास चिंतामुक्त करते. जसा झोपडीत तेवत असलेला दीप प्रकाश पसरवतो, तसा अंतर्मुखी ही देहरुपी घरात राहून मौनाची साधना करतो व त्याची ही साधना सर्वांना सुखरुपी उजेड देते. ह्या महान गुणास अंगीकारल्याने शक्तींचा क्षय नव्हे संचार होतो आणि सत्य ज्ञानाची प्राप्ती होते. बुद्ध मौनाच्या साधनेत जीवनभर मग्न राहिले व सत्याचा बोध प्राप्त करून महात्मा म्हणवले.

**अंतर्मुखता ज्ञानाचा तिसरा नेत्र उघडते व अंतरआत्म्याचा साक्षात्कार करविते. अंतर्मुखी झाल्याने आपोआपच स्वतःच स्वतःशी नातं जोडलं जातं आणि आत्म्याच्या मूळगुणांचा अनुभव होऊ लागतो. खरा आनंद व मानसिक तृप्ती आत्मिक चिंतनाने प्राप्त होते.** परंतु जेव्हा नाक, कान, डोळे, जीभ व त्वचा ह्या पंचज्ञानइंद्रियांद्वारे मन इंद्रियभोगाने वश बाह्य जगासी जोडलं जातं. तेव्हा क्रमशः सुगंध, संगीत, सौंदर्य, स्वाद व संभोग सुख (कामसुख) ह्या दैहिक भौतिक रसांचा मन अनुभव करतो. खर तर मन म्हणजे दैहिक इंद्रियांचा राजा होय. पण इंद्रिय दैहिक सुखाचे आमिष देऊन मनाला गुलाम बनवितात. डोळे म्हणतात, चांगले चांगले पाहू दे. कान म्हणतात, निंदानालस्ती ऐकू दे. जीभ आवडीचे पदार्थ खाण्याचा हट्ट करते तर नाक म्हणते सुगंध सुखासाठी तरसते. त्वचा चर्माकर्षणाने शरीर संबधा द्वारे काग विष्टेसमान कामसुखाची मागणी करते. ह्यामुळे इंद्रिय सुख प्राप्तीच्या नाना इच्छा जन्म घेऊ लागतात. तेव्हा स्वतःच विणलेल्या जाळयामध्ये स्वतःहून गुरफटलेल्या कोळ्याप्रमाणे मन इंद्रियांच्या इच्छाजाळात फसतं आणि व्यर्थ चिंतनात भटकंती करू लागतं. त्यामुळे मन नश्वर संसारात अधिकच गुंतू लागते व धाग्याच्या गुंतागुंतीप्रमाणे विभिन्न विषय विचारांची गुंतागुंत होते. त्याने मनात अशांती निर्माण होते व खरे आत्मसुख लोप पावते परंतु मनाला इंद्रिय आकर्षणापासून दूर करुन जेव्हा मनरुपी मुखाने आत्म्याशी संवाद साधला जातो, तेव्हा केवळ मुखाची वाणीच नव्हे तर इतर इंद्रियाच्या आवाजाला (अंतरमनात उठणाऱ्या इच्छांचा आवाज) संयमित करणे सहज सोपे होते. देहापासून वर उठल्यानेच आत्मिक अनुभूतीने स्थायी सुख शांतीची संपदा प्राप्त करणे शक्य होते.

अंतर्मुखता म्हणजे निव्वळ गप्प बसणे, मुखाने काहीही शब्द न काढता चुप राहणे नव्हे. परंतु खऱ्या अर्थाने मनाला इंद्रिय आकर्षणांपासून परावृत्त करुन, आत्म्याकडे वळवणे होय. संसारात राहूनही लक्ष जर अंतरआत्म्याकडे असेल तर बाहेरची वाणी आपोआप मौन होत जाते. कमी शब्दात काम होत जाते. ज्याचे मन अंतरजगात रममाण असते, त्याच्या व्यर्थ इच्छा ही आपोआप नाहिशा होतात व असा अंतर्मुखी आत्मसुखाने सुखावतो व बाह्यसुख साधनापासून सहज कमलपुष्पासमान अलिप्त होत जातो. तो कासवाप्रमाणे पाहिजे तेव्हा व हवा तसा इंद्रियांचा आधार घेतो व काम झाल्यानंतर इंद्रियांपासून अलिप्त न्यारा होतो आणि योगी बनून, निष्काम कर्म करत अतींद्रिय सुखाच्या सागरात बुडतो.

**अंतर्मुखता म्हणजे योगीची एक गुफाच होय. ज्याप्रकारे साधक दुनियेपासून दूर डोंगरमाळी जाऊन, गुफेत साधना करतो आणि सिद्ध पुरुष बनतो. अगदी तसच योगी ही देहाच्या इंद्रियांना आवर घालतो. अंतर्मुखी होतो आणि शरीरालाच साधनेचं स्थान बनवतो.** तो कर्म करताना ही मनी-ध्यानी एकाचाच (शिवबाबांचा) ध्यास करतो. तो एका ईश्वराचा अंत जाणण्यासाठी देहात राहून ही एकांतात असल्याचा अनुभव करतो. कारण अंतर्मुखी व्यक्ती सांसारिक विषय वासनांपासून मुक्त होत जातो. अंतर्मुखी झाल्याने देह व देहाच्या दुनियेपासून विरक्त होणे व इंद्रिय सुखापासून मन



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

बुद्धीला परावृत करणे अवघड नव्हे; सोपे वाटू लागते. त्यानेच आत्मचिंतनात रममाण होऊन आत्मअनुभूती करणे सहज शक्य होते.

अंतर्मुखता ही एक प्रयोगशाळा ही आहे. जसं वैज्ञानिक एकांतात एकट बसून प्रयोगावर प्रयोग करतात अन् नवे-नवे शोध लावतात, त्याप्रमाणेच योगी ही अंतर्मुखीच्या प्रयोगशाळेत आत्मउन्नतीच्या अभिनव हातोटींचा (ज्ञान बिंदूंवर आधारित युक्तींचा) वापर करतो आणि आत्मिक स्थितीचे असंख्य अलौकिक अनुभव करतो. विशेषतः अंतर्मुखी झाल्याने स्वतःच्या संकल्प, बोल व कर्मावर तीक्ष्णतेनं नजर ठेवता येते. ज्यामुळे आत्मनिरिक्षण व परिक्षणाने स्वतःच्या गुण-दोषांना जाणणे शक्य होते. गुण विशेष व कमी कमजोरी वा त्रुटींना पारखल्याशिवाय गुणांचा विकास व विकारांचा विनाश करणे संभव नाही. जर मन, वाणी, कर्म व दृष्टी बहिर्मुखी असेल तर ''दुसऱ्यांच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण स्वतःच्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही'' ह्या म्हणीप्रमाणे दुसऱ्यांचे दुर्गुण दर्शन सहज व मोफत होते. परंतु अंतर्मुखता सहजच आत्मदर्शन वा प्रभुदर्शन करविते.

आजचा भोगवादी मानव बहिर्मुखी झाल्याने इच्छा, कामना व वासनेचा गुलाम झाला आहे. ज्यामुळे त्याची झपाट्याने अधोगति होतेय. वर-वर पाहता, ऐश-आराम-मौजमजा ही बहिर्मुखी जीवनशैली मनाला भुरळ घालते. व्यक्तीला कमजोर बनवते. परंतु जो अंतर्मुखी होऊन आंतरिक प्राप्तींना महत्व देतो, तो दैहिक सुखाच्या साधन-संपत्तीमध्ये अडकत नाही. तर उलटपक्षी खऱ्या सुख-शांतीला जन्म देणारा साधेपणा, मितव्ययता, त्याग, अनासक्तता व संतोषासारख्या महान मूल्यांचे मोल जाणतो. त्याचे जीवन दिव्य गुणांची बहरलेली बाग असते. तो सद्‌गुणांच्या सुगंधाने स्वतः तर सुखावतोच, त्यासोबत इतरांना ही हवाहवासा वाटतो. असा अंतर्मुखी वाह्यात व व्यर्थ विषयांच्या चिंतनापासून मुक्त आणि आत्मचिंतन व परमात्म चिंतनाने युक्त असतो. त्याचे जीवन अगरबत्ती प्रमाणे दुर्गुणांच्या दुर्गंधाला सहजच दूर करते.

**नवीन वर्ष दारी आलयं. त्याचं अंतर्मुखी होऊन आनंदी मनानं स्वागत करुया. सदैव अंतर्मुखी होऊन विषय वासनाजनित विकृत विचाररुपी वैरींवर चाणाक्ष तीक्ष्ण नजर ठेऊ या अन् विकारांवर विजय मिळवू या. त्यासोबत आत्मिक सौंदर्य न्याहाळू या व स्वतःला आत्मचिंतन व परमात्म चिंतनात रममाण करु या व सुख-शांती-संतोषाची संपदा वाढवू या. अशा आपणा सर्वांसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!**

***

---


(पान १२ वरून)

धर्मग्लानीची लक्षणे स्पष्ट दिसत आहेत व मजला प्राप्त झालेल्या संदेशाप्रमाणे परमात्म्याचे अवतरण निश्चितच झाले असणार अर्थात त्याच्या अवतरणाची खातरजमा करुन घेण्यासाठी माझे ब्रह्माकुमारी विद्यालयात जाणे अपरिहार्य आहे. समस्त भक्तगणांनी ही समज बुद्धीत ठेवावी की, परमात्मा श्रीराम, श्रीकृष्णाच्या अथवा एखाद्या संतमहात्म्याच्या रुपात कधीही अवतरित होत नाही. त्यासाठी परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'मी साधारण वृद्ध तनात प्रवेश करुन अवतरित होतो.' बंधुनो, सद्गतीचा हा मार्ग तुम्हाला समजावा म्हणून परमात्म्याने जगभरात आपले गाईड ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारींच्या रुपात नियुक्त केले आहेत. जे ह्या गाईडची मदत घेतात तेच भविष्यात अंतिम सत्यमार्ग दर्शविणारे गाईड बनून ह्या सत्यमार्गावर मार्गस्थ होतात. फलस्वरूप त्यांचे परमात्म्याशी साकार मिलन होवून जन्मजन्मांतराची त्यांची अलौकिक इच्छा पूर्ण होते. ह्या साकार मिलनाचा अनुभव लक्षावधी ब्रह्मावत्सांनी कित्येक वेळा घेतला आहे. त्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाले तर हेच सांगता येईल की, 'दुनिया भगवान को ढूंढ रही है और हमने तो उसे पा लिया।' **बंधुनो, साकार मिलनाचे हे परम भाग्य प्राप्त करावयाचे असेल तर प्रथमतः आपल्या पारलौकिक पित्याचा यथार्थ परिचय प्राप्त करावा. बंधुनो, ज्याप्रमाणे भौतिक सूर्य व चंद्र संपूर्ण विश्वासाठी एक एकच आहेत, तद्वतच ज्ञानसूर्य पारलौकिक पिता परमात्मा व ज्ञानचंद्र अलौकिक पिता प्रजापिता ब्रह्मा ही विश्वातील सर्व मनुष्य आत्म्यांसाठी एक एकच आहेत. ह्याच ब्रह्माला इस्लाम धर्मात 'आदम' व ख्रिश्चन धर्मात 'अॅडम' म्हटले जाते.**

(क्रमशः)



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# आत्मा, परमात्मा, ड्रामा व प्रकृती अनादिअनंत काळाची असून प्रकृतिची कार्ये व परमात्म्याची कार्ये भिन्न-भिन्न आहेत (भाग २)

**ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे**

ह्या कल्पात कोणा आत्म्याचे शरीर निर्माण झाले व पुढील कल्पात त्याची निर्मिती झालीच नाही असे कदापी होत नसल्याने, शरीर निर्मितीचा हा क्रम अनादि अविनाशी आहे. **ह्याविषयी अवतरित झालेल्या परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'इस अनादि ड्रामामे हर एक आत्माको अपना अपना अनादि अविनाशी पार्ट मिला हुआ है।'** ज्याप्रमाणे सत्ययुगात आरंभ झालेला ड्रामा कलियुगाच्या अंताला समाप्त होतो. परंतु कल्पकल्पांच्या पुनरावृत्तीमुळे तो अनादि अविनाशी झाला आहे. तद्वतच कल्पकल्प प्रत्येक शरीराची पुनर्निर्मिती अथवा पुनरावृत्ती होत असल्याने समस्त आत्म्यांची शरीरेही अनादि आहेत. ज्याप्रमाणे प्रकृतीचा अर्थ शरीर आहे तद्वतच त्याचा दुसरा अर्थ आहे निसर्ग. हा निसर्ग ही अनादि आहे. तर पाच तत्वांच्या द्वारे निर्माण होणारे निसर्गाचे ऋतुचक्रही अनादि आहे. ज्याप्रमाणे कागदावर काढलेल्या वर्तुळाचा प्रथम बिंदू कोणता आहे, हे सांगता येत नाही. तद्वतच उन्हाळा, पावसाळा, हिवाळा ह्या ऋतुचक्रात प्रथमतः कोणता ऋतु निर्माण झाला हे सांगता येणा नाही. फलस्वरुप तर्कशुद्ध बुद्धीचा हाच निर्णय होईल की हे ऋतुचक्र अनादि आहे. अनादिचा कोणीही रचयिता असू शकत नाही. अर्थात परमात्माही ह्या ऋतुचक्राचा अथवा निसर्गाचा रचयिता नाही, असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. परमात्मा जसे प्रकृतीचा रचयिता अथवा पिता नसला तरी तो प्रकृतीपती मात्र अवश्य आहे कारण ज्यावेळी तो ह्या साकार सृष्टीवर अवतरित होतो त्यावेळी त्याला ऊन, वारा, थंडी, गर्मी व पाऊस त्याला प्रतिबंध करु शकत नाहीत. अर्थात परमात्मा असा कधीही विचार करणार नाही की 'आज थंडी गर्मी अथवा पाऊस आहे म्हणून साकार सृष्टीवर जाणे त्रासदायक होईल. अर्थात उद्या अवतरित होणे इष्ट होईल?' **बंधुनो, परमात्मा प्रकृतीपती आहे हे सिद्ध करणारे त्याचेच महावाक्य आहे की, 'मी प्रकृतीला अधीन करुन अवतरित होतो.'**

ज्ञानाची जागा अज्ञानाने अथवा अनुमानाने घेणे हे आजच्या समाजाची विशेषता आहे. विद्यालयात (शाळेत) असताना भौगोलिक ज्ञानाद्वारे मनुष्य हे शिकतो की, प्रकृतिची (निसर्गाची अथवा पाच तत्वांची) कार्ये कोणती व ती कशी चालतात. तसेच उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे ऋतु कसे कार्यरत होतात. परंतु कालांतराने त्याला ह्या ज्ञानाची विस्मृति होते आणि त्याच्या मनात भिन्न भिन्न अनुमानांची अर्थात अज्ञानाची निर्मिती होते. सूर्य उगवणे, मावळणे, दिवस रात्र होणे, उन्हाळा पावसाळा व हिवाळा हे ऋतु निर्माण करणे ही त्या परमात्म्याचीच कार्ये आहेत. तद्वतच मनुष्याने जीवशास्त्राद्वारे हे ज्ञान प्राप्त केलेले असते की, अन्य प्राण्यांचा व मनुष्याचा जन्म कसा होतो. तरीही भिन्न भिन्न धर्मातील बहुतांश लोक हेच म्हणतात की, 'भगवानने मनुष्यको बनाया है।' शरीर प्रकृतिकृत असल्याने प्रकृती त्याची निर्मिती करते. ह्याच कारणे एकमेकांच्या जवळ येणारी माणसे एकमेकांना विचारतात की कशी काय आहे तुमची प्रकृती? **बंधुनो, परमात्मा ना जीवात्म्याचा अर्थात ना जीवाचा (शरीराचा), ना आत्माचा निर्माता आहे. ज्याप्रमाणे आत्मा व परमात्मा अनादि आहेत, तद्वतच त्यांच्यातील पिता पुत्रांचा संबंधही अनादि आहे.** मनुष्याचा हा देखील गैरसमज आहे की, परमात्म्यानेच सूर्य, चंद्र, तारे निर्माण केले आहेत. त्याचबरोबर भिन्न भिन्न वृक्ष निर्माण करुन त्यावर पाने, फुले व फळे निर्माण करणे ही कार्येही परमात्म्याचीच आहेत. तो हे देखील म्हणतो की, 'त्याच्या इच्छेविना झाडाचे एक पानही हलत नाही' अशा मनुष्याने रंग बिरंगी फुले अथवा झाडे झुडपे



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

पाहिली तर तो सहजपणे म्हणतो की, काय त्या परमात्म्याची किमया आहे, त्याने ह्या फुलात भिन्न भिन्न रंग कसे भरले असतील? वास्तविक परमात्मा कोणत्याही फुलात रंग भरत नाही. त्या फुलझाडाच्या बीजातच तसे रंग निर्माण होणाचा प्राकृतिक गुणधर्म असतो. अर्थात ही किमया प्रकृतिची आहे. तद्वतच सूर्य उगवणे, मावळणे, दिवस रात्र होणे, वारा वाहणे, हिमवृष्टी होणे, उन्हाळा पावसाळा व हिवाळा हे ऋतु निरंतर येत राहणे ही प्रकृतिचीच कार्ये आहेत. परमात्म्याची नव्हेत.

प्रकृतिची अर्थात पंचमहाभूतांची कार्ये कोणती आहेत ते आपण यथार्थतः जाणले आहे. आता परमात्म्याची कार्ये कोणती आहेत व तो ती कोणत्या काळात कोणत्या द्वारे करतो ते आपण पाहूया. **बंधुनो, 'ज्या ज्या वेळी धर्मग्लानी होते त्या त्या वेळी मी अवतरित होतो' हे परमात्म्याचे महावाक्य गीतेतही आहे.** अर्थात ह्या साकार सृष्टीवर ज्यावेळी कामक्रोधादि मनोविकारांचा प्रादुर्भाव वाढतो व मनुष्यात्मे पूर्णतः पतित होतात. तसेच त्यांच्या विचारांनाही पतित अवस्था प्राप्त होऊन, अतिधर्मग्लानी होते त्यावेळी पतित पावन परमात्मा अवतरित होतो. अर्थात वर्तमान समय व गतकाळातील काही वर्षे हा अती धर्मग्लानीचाच समय असल्याने ह्या साकार सृष्टीवर अवतरित होवून, त्याने आपल्या भिन्न भिन्न कार्याचा आरंभ ८० वर्षापूर्वीच केला आहे. परमात्म्याच्या 'पतितपावन' ह्या विशेषणातच त्याचे प्रमुख कार्य कोणते असावे हे सहज समजते. पतितपावन अर्थात पतित आत्म्यांना पावन अवस्था प्राप्त करवून देणारा! त्यासाठी तो भगवद्गीतेचे सविस्तर ज्ञान प्रस्तुत करतो. तसेच जन्मजन्मांतरीची विकर्मे भस्म करण्यासाठी तो त्यांना राजयोगही शिकवितो. परमात्मा आपली तीन प्रमुख कार्ये त्रिदेवांच्या द्वारे करवून घेतो म्हणून आतापर्यंत सर्वसामान्य माणसेही हेच म्हणत आली आहेत की, तो ब्रह्माद्वारा स्थापना, विष्णुद्वारा पालना व शंकराद्वारे ह्या सृष्टीचा विनाश करवितो. अर्थात ही कार्ये तो अवतरित झाल्याशिवाय करु शकत नाही. ज्या साधारण वृद्ध देहात परमात्मा प्रवेश (परकाया प्रवेश) करतो त्याला तो नाव देतो 'प्रजापिता ब्रह्मा' त्याच्याद्वारे तो प्रथमतः अविनाशी रुद्र ज्ञानयज्ञाची स्थापना करतो. बंधुनो, सृष्टीच्या तिन्ही काळातील सर्व यज्ञात हा श्रेष्ठ यज्ञ होय! ह्या ज्ञानयज्ञात पती-पत्नी देखील ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी होवून, आपले अवगुण विशेषतः कामक्रोधादि विकारांना स्वाहा करुन टाकतात. परमात्म्याचे स्थापनेचे दुसरे कार्य आहे त्याने पावन केलेल्या मनुष्य आत्म्यांसाठी भारतात सत्ययुगी दैवी स्वराज्याची अर्थात स्वर्गाची स्थापना करणे. स्वर्ग अर्थात जेथे संपूर्ण सुख, शांती व पवित्रता आहे व त्याचे स्थापनेचे तिसरे कार्य आहे सत्ययुगी स्वर्गासाठी एका सत्यधर्माची अर्थात आदि सनातन देवीदेवता धर्माची स्थापना करणे. आज अनेक धर्म, अनेक कुळ, अनेक जाती, अनेक भाषा व भिन्न भिन्न संस्कृती असल्याने विश्वात अशांती निर्माण झाली आहे. अनेकतेमध्ये अशांती असल्याने सर्वोच्च बुद्धी असलेला परमात्मा, एका सत्यधर्माच्या स्थापनेबरोबरच चातुर्वर्णाचा व अनेक जातीपातींचा विनाश करुन, एकाच देवता वर्णाची, एकाच सूर्यवंशी कुळाची व एकाच भाषेची स्थापना करतो. सत्ययुग त्रेतायुगांत तब्बल २५०० वर्षे राज्यसत्ता व धर्मसत्ता राज्यकर्त्याच्याच हाती असते. हे देखील अखंड सुखशांती नांदण्याचे महत्वपूर्ण कारण आहे.

अशी सुखशांतिमय पावन सत्ययुगी सृष्टी निर्माण होण्यासाठी ह्या कलियुगी पतित सृष्टीचा महाविनाश होणे अत्यावश्यक असते. **ते कार्य एका शंकराद्वारे नव्हे तर अनेक शंकरांच्याद्वारे केले जाते. शंकर अर्थात तमोगुणाला भस्म करुन पाच तत्त्वांसहित मनुष्यसृष्टीत सत्त्वगुण निर्माण करणारा तपस्वी! ब्रह्मा, सरस्वती बरोबरच अनेक ब्रह्मावत्स राजयोगाद्वारे असे तप करतात की, अनेकानेक आत्म्यातील तमोगुण भस्म होऊन, सत्त्वगुण जागृत होतो. इतकेच नव्हे तर पाच तत्त्वांना योगदान देवून त्यांनाही ते सत्त्वगुणी अर्थात पवित्र बनवितात.** अन्य सत्संगात केवळ गुरु व त्यांचा एखादा दुसरा शिष्य पवित्रतेची पालना करतात. परंतु परमात्म्याला पवित्र युगाचीच स्थापना करावयाची असल्याने, लाखोंच्या संख्येत ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी त्याच्या श्रीमतानुसार पवित्रतेची धारणा करीत आहेत. बंधुनो, लक्षावधी सामान्य मनुष्यात्म्यांच्याद्वारे पवित्रतेची धारणा करवून घेणे हे 'न भूतो न भविष्यती' असे विश्वाच्या इतिहासातील एकमेव कार्य आहे जे कार्य केवळ सर्वशक्तिवान परमात्माच करु शकतो. परमात्म्याला



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

सत्ययुग त्रेतायुगासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यात्म्यांनी आपली दैवी संस्कारांनी परिपूर्ण व बंधनमुक्त स्थिति प्राप्त केली की, ह्या पतित कलियुगी सृष्टीचा विनाश होतो. अशाप्रकारे ब्रह्मा, सरस्वती व ब्रह्मावत्स सत्ययुगी स्वर्गीय सृष्टीच्या स्थापनार्थ निमित्त बनतात. तर ह्या पृथ्वीवर पापकर्मांचा भार वाढविणारे बहुतांश आत्मे, कलियुगी सृष्टीच्या महाविनाशासाठी निमित्त बनतात. प्रत्येक मनुष्यात्म्याने चिंतन करावे की, मी कशासाठी निमित्त बनणार आहे? केवळ भाग्यवान आत्मेच भाग्यविधात्याच्या ह्या कार्याला सहयोग देतात.

महाविनाशानंतरच सत्ययुगाची स्थापना होऊन श्री लक्ष्मी नारायण ह्यांच्याद्वारे दैवी प्रजेची पालना केली जाते. तत्पूर्वी श्री लक्ष्मी व श्री. नारायण ह्यांचा गतजन्म (पूर्वजन्म) कलियुगात होत असल्याने, त्यांचा तो जन्म साधारण मानव रुपात होतो. त्यांच्याद्वारेच परमात्म्याला युग परिवर्तनाचे अलौकिक कार्य करवून घ्यावयाचे असल्याने, कलियुगाच्या अंतिम चरणात अर्थात पुरुषोत्तम संगमयुगावर तो त्यांचे 'प्रजापिता ब्रह्मा व मातेश्वरी सरस्वती' असे अलौकिक नामकरण करतो. त्याचबरोबर परमात्मा त्यांना ही दिव्य स्मृती प्रदान करतो की सत्ययुगात तुम्हीच पाच हजार वर्षापूर्वी विश्वमहाराजन श्री. नारायण व विश्वमहाराणी श्री लक्ष्मीच्या रुपात राज्य केले होते. व अल्पावधीत स्थापन होणाऱ्या सत्ययुगातही प्रथमतः तुम्हालाच राज्य करावयाचे आहे. ह्या राज्यात अनेक दैवी पदाधिकारी व दैवी प्रजा निर्माण होण्यासाठी ह्या पुरुषोत्तम संगमयुगावर संपूर्ण पावन स्थिती कशी प्राप्त करावयाची, ह्याचे अमूल्य मार्गदर्शन परमात्मा ब्रह्मावत्सांना ज्ञान मुरलीद्वारे करतो. अर्थात सत्ययुगात श्री विष्णुने दैवी प्रजेची पालना करण्यापूर्वी त्या होवनहार देवी देवतांच्या आत्म्यांची पालना त्यांच्या पूर्वजन्मात संगमयुगावर स्वतः परमात्मा करतो. ह्या पालनेत तो लक्ष्मी नारायण ह्यांच्याही आत्म्यांची अर्थात ब्रह्मा व सरस्वती ह्यांची पालना करतो. ह्या पालनेबरोबरच प्रजेची पालना करण्याचे संस्कार परमात्मा त्यांच्या आत्म्यात निर्माण करतो. फलस्वरुप सत्ययुगात त्यांच्याद्वारे दैवी प्रतेची पालना सर्वोत्तम पद्धतीने केली जाते. **अशाप्रकारे स्थापना, पालना व विनाश ही तीन कार्ये तो ब्रह्मा, विष्णु, शंकर ह्या त्रिदेवांच्या द्वारे करून घेतो. संपूर्ण लेखाचा सारांश हाच आहे की, आत्मा, परमात्मा, परमधान, चार युगातून अविरत भ्रमण करणारे हे वैश्विक नाटक, तद्वतच पृथ्वीला प्रकाश देणारे सूर्य, चंद्र, पृथ्वीवरील पाच तत्त्वे व जीवसृष्टी अनादि अनंत काळाची आहे. त्यांचा कोणीही निर्माता नाही.** तसेच सदरहू लेख वाचल्यानंतर परमात्म्याची कार्ये कोणती आहेत व प्रकृतिची कार्ये कोणती आहेत ह्याविषयी आपल्या मनात कोणताही संभ्रम राहणार नाही. सर्व संभ्रम दूर होऊन आपणास यथार्थ ज्ञान प्राप्त व्हावे इतकीच अपेक्षा आहे. तसेच आपण सर्व आत्म्यांनी त्या एकाच परमात्म्याच्या श्रीमताला जाणले तर सर्वांच्या विचारात एकता येवून, अल्पावधीतच रामराज्य स्थापन होईल.

बंधुनो, ज्याप्रमाणे ह्या जगतासाठी भौतिक सूर्य एकच आहे. तद्वतच ज्ञानसूर्य परमात्माही एकच आहे. तोच सर्वांचा एकमात्र सद्गुरु, सद्शिक्षक व मातापिता आहे. 'त्वमेव माताश्च पिता त्वमेव... ' हे केवळ त्याचेच गायन आहे. ज्याप्रमाणे देहाचे मातापिता घरात नसताना मोठ्या भगिनीच्या अथवा मोठ्या भावाच्या आज्ञांचे पालन करावयाचे असते. तद्वतच पारलौकिक मातापिता परमात्मा जोपर्यंत अवतरित होत नाही तोपर्यंत जेष्ठ व मान्यवर बंधु भगिनींचे अर्थात संतमहात्म्यांचे व गुरुंच्या आज्ञांचे पालन करावयाचे असते. त्या आज्ञांचे पालन आपण भक्तिमार्गात केलेच आहे. परंतु आता पारलौकिक पिता परमात्मा अवतरित झाला असल्याने, त्याच्या सर्वोच्च मताचे पालन करु या. **सद्गुरु परमपिता परमात्म्याशिवाय अधिक कल्याणकारी अन्य कोणीही संत महात्मा अथवा गुरु असू शकत नाही. कारण तोच एकमात्र पतितपावन आहे. तोच मनुष्यात्म्यांना पावनस्थिती प्राप्त करवून सुखशांतीने युक्त अशा पावन विश्वात घेऊन जाणारा आहे.** मुनष्यात्म्याने पावन स्थिती का प्राप्त करावयाची हे देखील समजणे अत्यावश्यक आहे. ज्यावेळी आत्मा, परमात्म्याच्या श्रेष्ठ श्रीमताप्रमाणे पाच मनोविकारांना नष्ट करण्याचा पुरुषार्थ करून, पावन स्थिती प्राप्त करतो त्यावेळी त्याचे भविष्यातील वीस जन्म सत्ययुग त्रेतायुगात होतात. तसेच ह्या दैवी युगात पाच तत्त्वेही पावन असल्याने, पाच तत्त्वांचे शरीरही पावन

(पान ३२ वर)



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# सकारात्मक चिंतन हाच स्वउन्नतीचा आधार

**ब्र. कु. भगवान भाई, शांतिवन (आबू रोड)**

प्रत्येक मनुष्याचे जीवन अनेक अनुभवांनी भरलेले असते. त्यातील काही अनुभव सुखद असतात. जे सदैव आपण आपल्या स्मृतीत साठवून ठेवतो व त्यापासून आपल्याला प्रेरणा प्राप्त होते. जीवनात येणाऱ्या अनुभवातूनच आपली विचारधारा निर्माण होते. चांगले व सुखद अनुभव आपल्यामध्ये सकारात्मक प्रवृत्तीला जन्म देतात. त्यातूनच आपण सकारात्मक चिंतन करीत जातो.

**आपले चिंतन जर सकारात्मक असेल तर आपल्या जीवनातील सर्व समस्यांचा आपण सहज सामना करू शकतो. आपली स्थिती जराही विचलीत होऊ न देता, शांत चित्ताने परिस्थितीचा सामना करु शकतो. अशा वेळी आपल्या श्रेष्ठ स्वमानांची स्मृती आपल्यात विशेष शक्ती प्रदान करते. त्यामुळे विपरीत परिस्थितीतही आपण सकारात्मक चिंतन करतो फलस्वरुप आपली सदैव स्वउन्नती होत जाते.**

सकारात्मक, शक्तिशाली व मूल्यवान विचार तेव्हाच उत्पन्न होतात जेव्हा आपण शांत स्वरुपात स्थित असतो व अशा प्रकारच्या शांत स्वरुप स्थितीसाठी आवश्यक आहे, मनातील नकारात्मक, व्यर्थ व कमजोर विचारांना हद्दपार करणे. उदाहरणार्थ एका ग्लासात अर्धे पाणी आहे. ही गोष्ट जेव्हा आपण अशा प्रकारे सांगतो की अर्धा ग्लास पाण्याने भरलेला आहे तेव्हा आपला हा विचार सकारात्मक प्रवृत्ती दर्शवतो. परंतु जेव्हा आपण असे म्हणतो की अर्धा ग्लास खाली आहे तेव्हा आपली नकारात्मक प्रवृती दिसून येते. ही नकारात्मक प्रवृत्ती, व्यर्थ संकल्पांना जन्म देत असते. यातूनच पुढे जीवनात उदासीनता येते.

सकारात्मक चिंतनाने आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या विचारांची आपण विवेक संमत पद्धतीने पडताळणी करू शकतो. ते ज्ञानयुक्त, युक्तीयुक्त आहेत का नाही, हे पाहू शकतो. तात्पर्य म्हणजे सकारात्मक चिंतन ही मनाला स्वच्छ, निर्मळ बनविण्याची एक प्रक्रिया आहे. ज्यामुळे आपण शांती स्वधर्मात टिकू शकतो. मुख्य म्हणजे सकारात्मक चिंतन आपल्या नियमित योगाभ्यासाच्या प्रक्रियेत सुखद अनुभूती प्रदान करण्यासाठी सहाय्यक सिद्ध होते. प्रामुख्याने सदैव स्वमानात रहाणे व संतुष्ट असणे या दोन गोष्टी सकारात्मक चिंतनाचा आधार आहेत. सकारात्मक चिंतनाद्वारेच आपण एकरस स्थिती प्राप्त करु शकतो.

जो सकारात्मक चिंतन करतो तो परचिंतनापासून मुक्त असतो. परचिंतनातूनच व्यर्थ संकल्पांचा व नकारात्मक प्रवृत्तीचा जन्म होतो. दुसऱ्यांविषयीचे चिंतन व चिंता यापासून जो मुक्त आहे तोच सकारात्मक चिंतन करू शकतो. परिणामतः दुसऱ्यांच्या कमजोरीमुळे आपण स्वतः धोका खात नाही. आपण संसारिक तणावापासून सदैव मुक्त असतो. एकंदरीत संसाराकडे पहाण्याची आपली दृष्टी देखील सकारात्मक बनते. 'आजवर जे झाले ते चांगले झाले, ते होत आहे ते ही चांगलेच आहे व भविष्यात जे होणार आहे ते नक्कीच अधिक चांगले असेल, अशा सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला लाभतो.'

सकारात्मक चिंतनाने आपली स्थिती श्रेष्ठ बनते तसेच विश्व कल्याणासाठी आपण निमित्त बनतो. आपल्यातील स्वार्थ भाव संपुष्टात येतो. 'विश्वातील सर्व आत्म्यांचे कल्याण व्हावे' याच भावनेने ओतप्रेत भरलेले वायब्रेशन आपण पसरवू लागतो फलस्वरूप आपली स्वउन्नती वा स्वपरिवर्तन होत जाते. त्याचबरोबर विश्व परिवर्तनासाठी आपण निमित्त बनतो.

**सकारात्मक चिंतनाचा अभ्यास जर आपण दीर्घकाळ करीत राहिलो तर आपली उपराम स्थिती बनत जाते. व्यर्थ संकल्प व नकारात्मक चिंतन या**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

**गोष्टींची अविद्या होते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे उपराम स्थितीमुळे आपण निरंतर योगी बनतो अर्थात परमपिता शिव पित्याशी आपला संबंध सदैव जुळलेला असतो.** फलस्वरूप आपल्या मनात सर्वांविषयी श्रेष्ठ कल्याणकारी भावना उत्पन्न होते. आपला शांत व संतोषजनक स्वभाव, आपल्या हृदयाला विशाल बनवतो. त्यामुळे सामाजिक वातावरणात संतुलन राखण्यात आपण यशस्वी ठरतो. म्हणूनच आपल्या जीवनात स्वउन्नतीसाठी सकारात्मक चिंतन केवळ आवश्यक नाही तर अनिवार्य आहे. सारांशाने असे म्हणता येईल -

**सकारात्मक चिंतन,**
**हेची स्वउन्नतीचे साधन ।**
**जेणे होई आत्मा पावन,**
**घडतसे विश्वकल्याण ।।**

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात आले असेल की सकारात्मक चिंतन हे गंगाजलाप्रमाणे शुद्ध व स्वच्छ असते. त्यात जरा सुद्धा व्यर्थ व नकारात्मक चिंतनाची घाण वा कचरा नसतो. याचेच गायन भक्तिमार्गात केले जाते. -

**जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन ।**
**भगवंत जाण तये जवळी ।**

तात्पर्य म्हणजे जेथे मन-बुद्धीची शुद्धता व स्वच्छता आहे तेथे परमात्मा पिता आपल्या जवळ असतो. त्याचबरोबर जेथे परमात्मा आहे तेथे प्रत्येक पावलागणिक सफलता वा उन्नती हमखास होत असते. म्हणून सदैव सकारात्मक चिंतन करा.

## ८ मार्च - आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त

**आदि काळापासूनच आपल्या भारतात नारीला सन्मान व उत्तम दर्जा दिला जात होता. आदि काळात स्त्री-पुरुष दोघांना समान अधिकार होते. नारीला पूज्यनीय तसेच घरची लक्ष्मी समजण्यात येत होते. हळू हळू समयाचे चक्र फिरत गेले व आत्म्याची शक्ती कमजोर होत गेली. परिणामतः लोक आपल्याला देहधारी समजू लागले. समाज पुरुषप्रधान होत गेला. त्यामुळे आदि काळात ज्या नारीला मनुष्य देवी समान दर्जा देत होता, तिलाच तो भोग विलासाची वस्तू समजायला लागला.**

समयानुसार समाजातील वाईट परंपरादेखील वाढत गेल्या; उदाहरणार्थ हुंडा पद्धती, बालविवाह, सती जाणे, बुरखा पद्धती, स्त्री शिक्षणावर बंदी अशा अनेक गोष्टीमुळे नारीचे अधिक शोषण होत गेले. सध्याच्या विज्ञान युगात देखील स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या, बलात्काराच्या घटना वाढतच चालल्या आहेत. समाजात कन्या भ्रूण हत्या करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

नारीच्या या दयनीय स्थितीचे मूळ कारण आहे, नारीला उच्च कोटीच्या आध्यात्मिक शिक्षणापासून वंचित ठेवणे. **आता स्वयं परमपिता शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमाने महिलांसाठी उच्चतम आध्यात्मिक शिक्षण प्रदान करीत आहेत. ज्या शिक्षणाने नारी पुन्हा आपले गतवैभव प्राप्त करू शकेल. आपली उच्चतम स्थिती प्राप्त करू शकेल व सन्मानित जीवन जगू शकेल. अशी शिक्षित नारी आपल्या परिवाराबरोबरच समाजाचे देखील कल्याण करू शकेल. समाजाची आध्यात्मिक पातळी वाढवू शकेल. त्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या जवळच्या सेवाकेंद्रावर जाऊन विनामूल्य आध्यात्मिक ज्ञान अवश्य प्राप्त करा. या संस्थेची १४५ देशात ९००० पेक्षा ही अधिक सेवाकेंद्रे सेवारत आहेत.**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18




# आरोग्यम् धनसंपदा

## (मधुमेह, अन्य तणावजन्य आजार आणि राजयोग)

**ब्र. कु. डॉ. दिलीप कौंडिण्य, एम्. डी.**

कलियुगाच्या या शेवटच्या काळात माणसांचे शब्द गोड नसतात. त्यांच्या रक्तात साखरेचे प्रमाण भरपूर असून देखील वाणीतील गोडवा मात्र नाहिसा झाला आहे. कारण रक्तात साखर आहे परंतु मनात नाही. आज जीवनशैली तणावग्रस्त बनली आहे. मन चिंता, भय आणि वैफल्याने ग्रासलेले आहे. परिणामी आजचा मानव स्वतःही आनंदी व सुखी नाही तसेच तो दुसऱ्याला सुद्धा काहीच देऊ शकत नाही. माईंड-बॉडी-मेडिसिन या अद्ययावत वैद्यकीय शाखेत संशोधनाद्वारे असे सिद्ध झाले आहे की विकल्प, वासना आणि तणाव या मनातील विकारांमुळे मधुमेहच नव्हे तर कॅन्सर, उच्च रक्तदाब, डिप्रेशन, बुद्धीभ्रंश इत्यादी अनेक आजार निर्माण होतात.

डॉ. एन.एन.वीग, पी.जी.आय. चंदीगडमध्ये कार्यरत मानद मानसोपचारतज्ज्ञ सांगतात की आध्यात्मिक शून्यतेमुळे विवेक शून्यता निर्माण होते. सारासार बुद्धीचा नाश म्हणजेच विवेकशून्यता होय. त्यामुळे 'सेल्फी सिन्ड्रोम' निर्माण झाला आहे. **'आज माणसाचे लक्ष मी कोण आहे' या मूलभूत प्रश्नावर केंद्रित नसून 'मी कसा दिसतो' यावर केंद्रित आहे. यालाच परमात्मा शिव पित्याने शिकविलेल्या राजयोगात 'देह अभिमान' असे नाव दिले आहे. हा देह अभिमानाच माणसांच्या सर्व आजारांकरिता व दुःखाकरिता कारणीभूत आहे. भगवद्गीतादेखील हेच सांगते.** एडस्सारखा जीवघेणा रोग देखील मनातील अविचारी वासनेमुळे उद्भवतो. राजयोगाचा प्रयोग करून निरंतर ध्यानात मग्न राहण्याची किमया साधल्यास एच.आय.व्ही. काय, माया अर्थात (५ विकार) सुद्धा लांबूनच नमस्कार करून निघून जातात. पण याकरिता एक पथ्य आहे. स्वयं परमात्या शिव पिता सांगतात की दीर्घ काळासाठी केलेल्या राजयोगाच्या साधनेशिवाय हे घडू शकत नाही. विधीपूर्वक केल्यास सिद्धी अवश्य प्राप्त होते.

मधुमेह, कॅन्सर इत्यादी तणावग्रस्त आजारांना एन.सी.डी. (Non communicable diseases) असे म्हणतात. वैद्यकीय सेवा संचालनालय येथे सन २०१२ मध्ये एन.सी.डी. विंग उघडण्यात आली. परंतु एन.सी.डी.चे प्रमाण भयावह रीतीने वाढतच चालले आहे. याचे कारण म्हणजे भारतीय डॉक्टरांना माईण्ड-बॉडी-मेडिसिन या अद्यावत विषयाबाबत काहीच माहित नाही. तणाव मनात तयार होतो. परंतु शरीराच्या मनोमय कोषावर कार्य करणारे एक देखील औषध नाही. पातंजलीचे ध्यान मनोमय कोषाकरिता टॉनिक आहे. मन सशक्त असणे, नितांत आवश्यक आहे. कारण त्याशिवाय नैतिक आणि सामाजिक मूल्यांची धारणा घडवून आणणारा मनोनिग्रह प्राप्त होत नाही. अमेरिकेतील प्राध्यापक डॉ. रिचर्ड डेव्हीडसन यांनी प्राचीन ध्यान व धारणेच्या तंत्राकरिता 'माईण्डफूलनेस मेडिटेशन' असे नाव दिले. त्यानंतरच भारतीय डॉक्टर्स पातंजलीच्या ध्यान-धारणेस शास्त्र संमत मानू लागले.

वयाची साठी ओलांडल्यानंतर मला आजारी पडण्याची भीती वाटू लागली होती. कोणत्याही रुग्णालयात निपचित पडलो आहे. भरमसाठ किमतीच्या औषधांचा मारा होत आहे. तरी पण रोग बरा होत नाही. थकवा जात नाही अशा अवस्थेत आपली मुलं मनात म्हणत आहेत की बाप धड राहत पण नाही आणि लवकर जात पण नाही. सदर अवस्था एन.सी.डी. रोगांच्या चक्रव्यूहामध्ये केव्हाही येऊ शकते. या भीती पोटी मी पातंजली योग (ज्ञानात येण्यापूर्वी) करीत असे अगदी तास-दोन-तास करीत असे. पण मन कधीच एकाग्र होत नव्हते. तथापि ब्रह्माकुमारींच्या राजयोगाद्वारे सदर किमया अवघ्या तीन महिन्यात साध्य झाली.



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

अशा प्रकारची एकाग्रचित्त अवस्था प्राप्त करणे, आपल्या सर्वांचे एकमेव ध्येय असले पाहिजे. आत्मिक बिंदू रुपात एकाग्र झाल्यास सर्व बंधने, मोह, वासना आणि मानसिक यातना यापासून मुक्ती प्राप्त होते. म्हणजेच जणू याच जन्मात स्वर्गसुख उपभोगण्यासारखे आहे. आज सर्वात जास्त मानसिक यातना आपल्या मुला-बाळांकडून, नातेवाईक व मित्रांकडून मिळतात. यातून मुक्त होण्यासाठी आपले सर्व संबंध एक परमात्म्याशी जोडा व त्याच्या मधुर स्मृतीत, परम आनंदाचा अनुभव करा.

**माईण्ड-बॉडी-मेडिसिनचा एक सिद्धीत आहे - 'नेहमीच शांत, आनंदी आणि खुशीत राहिल्यास आजार होणार नाहीत.' मधुमेह तर अगदीच क्षुल्लक बाब आहे. हीच गोष्ट शिवबाबा मुरलीद्वारे आपल्या मनात ठसवितात, ''खुशी जैसी खुराक नही। योगाग्निद्वारे विकर्म भस्म करो तो सब रोग और दुःख गायब हो जायेंगे।'' नियमितपणे विधीपूर्वक राजयोगाचा अभ्यास केल्यास, साधकांमध्ये साक्षात परमेश्वरी औषधांचे स्त्राव निर्माण होतात.** लठ्ठपणा पासून कॅन्सर पर्यंत सर्व रोगांवर हे स्त्राव रामबाण औषधाचे काम करतात. म्हणजेच लाख दुःखांचे औषध फक्त एक राजयोग हेच आहे. परंतु भारतीय डॉक्टर्स अजून देखील हे मान्य करायला तयार नाहीत. सदर बाब आध्यात्मिक शून्यता आणि विवेकशून्यता याचे उत्तम उदाहरण आहे.

खर तर आपल्या तन-मनाच्या आरोग्यात आपल्या मनाच्या संकल्पांचा व आपल्या स्थितीचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. जसे आपले संकल्प असतील त्यानुसार शरीराच्या ग्रंथीतून रस प्रवाहित होतात, जे आपल्या दैहिक स्वास्थ्यासाठी कारण बनतात. जेव्हा मनुष्य भय-चिंता, राग-द्वेष, ईर्ष्या-घृणा, दुःख-अशांती, विषयवासना इत्यादीमुळे ग्रसित होतो, त्यावेळी जे रस स्त्रवित होतात, ते अनेक रोगांचे कारण बनतात. याउलट **मनुष्य जेव्हा प्रभु स्मृती, योग-साधना याद्वारे आत्मिक प्रेम इत्यादींनी भरपूर होतो त्यावेळी त्याच्या शरीरातील ग्रंथीतून जे रस स्त्रवित होतात, त्याद्वारे अनेक रोग बरे होतात. त्यामुळे निरोगी जीवन जगण्यासाठी नियमितपणे राजयोगाचा अभ्यास करा. माझे स्वतःचे ६ असाध्य रोग, राजयोगाच्या अभ्यासाने अल्पावधीतच बरे झाले. आपणही याचा अनुभव करा. याचेच गायन आजही केले जाते.**

**'सिमर - सिमर सुख पाओ, कलह - क्लेश मिटे सब तन के, जीवन मुक्ति पाओ'**

***

## प्रपत्र ४ : अमृतकुंभ द्वैमासिकाविषयीचे निवेदन

१) प्रकाशन स्थळ - प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (प.) ४००६०४
२) प्रकाशनाचा अवधी - द्वैमासिक
३) मुद्रकाचे नाव - बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
अ) भारताचे नागरिक आहेत का? होय.
मुद्रणस्थळाचा पत्ता - परफेक्ट प्रिंटस्, २२, इंडस्ट्रियल इस्टेट, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे (प) ४००६०१
४) प्रकाशकाचे नाव - बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
अ) भारताचे नागरिक आहेत का? होय.
पत्ता - द्वारा प्रजापिता ब्रह्माकुमारीज, ए -१० वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पू) ४००६०३
५) संपादकाचे नाव - बी. के. शिवाजी चौधरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
अ) भारताचे नागरिक आहेत का? होय.
पत्ता - सी -२ वनविहार हौसिंग सोसायटी, कोपरी, ठाणे (पू) ४००६०३ (महाराष्ट्र)
६) मालकाचे नाव व पत्ता - प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय,
माऊंट आबू (राजस्थान)
मी बी. के . गोदावरी, असे प्रमाणित करते की माझ्या ज्ञानानुसार वरील माहिती सत्य आहे.

**(बी. के गोदावरी)**
**प्रकाशक, अमृतकुंभ**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# शिवजयंती! अजन्माचा वाढदिवस!!

## (अनुभव)

**ब्र. कु. प्रकाश तलाठी, पुणे**

तीन वर्षापूर्वी दीदी डॉक्टर निर्मला यांनी मला शिवजयंती निमित्त श्रीलंकेला सेवेसाठी पाठविले होते. ब्र. कु. कमलेश, श्रीलंकेचे राष्ट्रीय सहकारी होते. त्यांनी माझ्यासाठी चार मोठ्या शहरामध्ये प्रत्येकी १५ दिवसाचे कार्यक्रम आयोजित केले होते. शिवजयंतीच्या कार्यक्रमासाठी मी ब्यॉटीकॅलाव (Batticalao) या शहरामध्ये आलो होतो. तेथील एका कॉलेजच्या मैदानावर हा प्रोग्राम होणार होता. सुमारे एक लाख लोकांची उपस्थिती अपेक्षित होती. एवढ्या मोठ्या जनसमुदायाला यापूर्वी मी संबोधले नव्हते. खरोखर हे माझे केवढे मोठे भाग्य होते! या मोठ्या कार्यक्रमासाठी कोणातरी दादींना किंवा वरिष्ठ भाईंना आमंत्रित करणे योग्य होते. परंतु ड्रामामध्ये ते माझ्या भाग्यात होते!

या कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणावर जाहिरात करण्यात आली होती. टपावर ज्योतिर्लिंग असलेल्या ६ जीप गावोगावी फिरत होत्या. रेडिओ, टि.व्ही. वर या कार्यक्रमाची घोषणा केली जात होती. या सर्व गोष्टींचा अतिशय चांगला परिणाम घडून आला. प्रोग्रामसाठी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. त्याप्रसंगी वक्ता म्हणून मी माझ्या भाषणाला पुढील प्रमाणे सुरुवात केली –

मी सर्व प्रथम उपस्थितांना त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दिवस होता शिवजयंतीचा! म्हणजे वाढदिवस होता शिव परमात्म्याचा!! परंतु मी त्यांच्या वाढदिवसाच्या श्रोत्यांना शुभेच्छा दिल्या आणि सर्वांना खुश करून टाकले. परंतु हे कसं काय? हा प्रश्न त्यांना पडला. त्यावेळी मी त्यांना स्पष्टीकरण दिले की जेव्हा मुलाचा जन्म होतो तेव्हाच माणूस बाप बनतो. अन्यथा तोपर्यंत बाप केवळ एक संसारी माणूस असतो, बाप नव्हे. म्हणून मुलाचा जन्म तोच बापाचा जन्म. आपण जन्मलो म्हणून शिवबाबा बाबा झाले. त्यामुळे आपला जन्म तोच शिवबाबांचा जन्म आणि शिवबाबांचा जन्म तोच आपला जन्म! यास्तव तुम्हाला तुमच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा!! हे ऐकून सर्वत्र हास्याची आणि प्रसन्नतेची लहर पसरली.

**एक तूच निराकारी, निरहंकारी व निर्विकारी –**

पुढे जाऊन मी श्रोत्यांना प्रश्न केला की तुमच्या जीवनात जेव्हा एखादी अप्रिय घटना अथवा मती कुंठीत करणारी गोष्ट अचानक घडते तेव्हा तुमच्या मुखातून कोणते उद्गार बाहेर पडतात? 'Oh God! हे प्रभू!' अशावेळी प्रभूची कोणती मूर्ती तुमच्या मनाच्या पटलावर येते? प्रामाणिकपणे सांगायचे झाल्यास कोणतीही मूर्ती मनाच्या पटलावर येत नाही. 'आई ग!' म्हणताच आईची मूर्ती मनोपटलावर येते. मग हे प्रभू! म्हणताच परमेश्वराची मूर्ती का येत नाही? **कारण परमेश्वराला मनुष्याचा आकार नाही. तो निराकारी आहे, निरहंकारी व निर्विकारी आहे. विकार व अहंकार हे नकारात्मक (Negative) आहेत. म्हणेज परमेश्वरामध्ये जरासुद्धा नकारात्मकता (Negativity) नाही. तो १००% सकारात्मक (Positive) आहे. तो सकारात्मक उर्जेचा मूळ स्त्रोत आहे.**

याचा अर्थ मानवी शरीर असणारा कोणीही परमेश्वर असू शकत नाही. **भक्तिमार्गात आपण ज्या ३३ कोटी देवीदेवतांची भक्ती करतो, त्या सर्वांना तर मानवी शरीरधारी आहेत. याचा अर्थ ते परमेश्वर नाहीत. देवीदेवता आहेत. परमेश्वराची पहिली रचना ज्याबद्दल असे म्हटले जाते की 'God made man in his own image!' ते परमेश्वराची प्रतीकृती आहेत. परंतु प्रतीकृती इतकी श्रेष्ठ आहे की आपण प्रतीकृतीलाच परमेश्वर समजून बसलो. तात्पर्य म्हणजे देवी–देवता परमेश्वराची रचना आहेत. प्रतीकृती आहेत, मूर्ती**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

**आहेत, चित्र आहेत परंतु परमेश्वर नव्हेत.**

त्या ३३ कोटी देवी-देवता मध्ये एक अशी मूर्ती आहे की जिला मनुष्याचा आकार नाही. ती मूर्ती आहे ज्योतिर्लिंग वा शिवलिंगाची. या ज्योतिर्लिंगाला आपण शिवलिंग असे का म्हणतो? कारण शिव शब्दाचा अर्थच आहे 'विश्वकल्याणकारी' आणि दुसरा अर्थ आहे 'पवित्र'. परमेश्वर सदैव पवित्र असल्यामुळे त्याला 'सदाशिव' असेही म्हटले जाते. तोच पतितांना पावन बनविण्याचे कार्य करतो. त्यामुळेच 'पतिपावन' म्हणून ओळखला जातो. असा हा विश्व कल्याणकारी सदाशिव परमात्मा आपले कल्याण कसे करतो? त्यासाठी निराकार शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या साकार शरीराचा आधार घेऊन, या सृष्टीवर अवतरीत होतो व त्यांच्या मुखकमलाद्वारे सत्य गीता ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देतो. यालाच परमात्म्याचा दिव्य जन्म वा दिव्य अवतरण असे म्हटले जाते. परमात्म्याचा जन्म मनुष्यसदृश मातेच्या गर्भातून होत नसल्याने त्याला 'अजन्मा' असे ही म्हटले जाते. अशा या अजन्मा परमात्म्याच्या दिव्य जन्माचे वा अवतरणाचे यादगार पर्व 'महाशिवरात्री' आपण मोठ्या आनंदाने दरवर्षी साजरे करतो.

आपल्या मनात पुढचा प्रश्न उपस्थित होईल की परमात्म्याचे अवतरण केव्हा होते? याचे उत्तर भगवद्गीतेतही पुढीलप्रमाणे नमूद केले आहे -

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानम् अधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। (अ. ४ श्लो. ७)**

(जेव्हा जेव्हा भारतामध्ये धर्मग्लानी होते, अधर्म पसरतो तेव्हा तेव्हा अधर्माचा विनाश करुन एका सत्यधर्माची स्थापना करण्यासाठी मी येतो.) आता भारताची काय परिस्थिती आहे, हे आपण जाणतोच. किती धर्म आहेत, प्रत्येक धर्माच्या किती शाखा, उपशाखा आहेत, किती मतमतांतर आहे. समता, बंधुभाव, आपुलकी, सद्भावना, स्नेह-सन्मान शोधूनही सापडत नाही. याउलट पापाचार, भ्रष्टाचार, अत्याचार, हिंसाचार, दंगली यांनी वातावरण पेटलेले आहे. किती ही धर्मग्लानी आहे. ३-४ वर्षाची अजाण मुलगी, अपंग, अधू, वेडसर मुलगी अथवा ६५-७० ची म्हातारी सुद्धा विकाराची शिकार बनत आहेत. महाभारताच्या काळामध्ये जसे द्रौपदी वस्त्रहरण घडले तसेच भारताच्या राजधानीत दिल्लीला दिवसाढवळ्या घडत आहे आणि जे दिल्लीला घडत आहे ते गल्लोगल्ली घडत आहे. **पुनश्च महाभारताचा काळ आला असून, गीता ज्ञान देण्यासाठी प्रत्यक्ष भगवान अवतरण्याचा हा काळ आहे. हीच योग्य वेळ आहे परमेश्वराच्या अवतरणाची! मी आपणास ही खास खबर (Breaking news) देत आहे की निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण सन १९३६ मध्ये साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात झाले आहे. तो आपले कर्तव्यकर्म करीत आहे. आपल्या मुलांच्या भेटीसाठी तो उत्सुक आहे आणि प्रत्येकाला त्याचा निरोप जरूर मिळत आहे; जसा आज तुम्हाला मिळाला.**

प्रत्येक पिता आपल्या मुलांसाठी जरूर काहीतरी घेऊन येतो. तसाच हा कुटुंबवत्सल पिता आपल्या मुलांसाठी (आपणासाठी) तळहातावर स्वर्ग घेऊन आला आहे. स्वर्गामध्ये जाण्यासाठी "पात्र, लायक" बनण्याची मानवास आवश्यकता आहे. त्यासाठी अध्यात्मिक शिक्षणाची, पवित्रता, मानसिक व अध्यात्मिक परिर्वतनाची मुलभूत गरज आहे आणि हे कार्य केवळ पतितपावन, ज्ञानसागर परमात्माच करू शकतो.

घरात मुलाचा जन्म होताच 'वारस जन्मला' असे म्हटले जाते. काहीही मेहनत न करता जे बापाचे असते ते मुलाचे होऊन जाते. परमेश्वराला आपण आपला पिता मानत आलो आहोत. परंतु या पित्याकडून आपल्याला वारसा मिळू शकतो किंवा त्याच्याकडून आपण आपला वारसा घेतला पाहिजे, असा विचार आपल्या मनात कधी येतच नाही. **परंतु तो म्हणतो, 'माझ्या लाडक्या मुलांनो, तुमच्यासाठी मी स्वर्गसुखाचा, स्वर्गाच्या राजाईचा वारसा घेऊन आलो आहे. परंतु तो वारसा मिळाल्यानंतर तो सांभाळण्यासाठी शिक्षणाची, पवित्रता धारण करण्याची, मानसिक व आध्यात्मिक परिवर्तनाची मुलभूत गरज आहे. यासाठी तुम्हाला माझ्या सतत संपर्कात राहून शिक्षण घेतले पाहिजे, व्यवहारात वापरून अनुभवीमूर्त बनले पाहिजे. यासाठी राजयोगाचा अभ्यास अवश्य करायला हवा.'**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

ज्या आपल्या पित्याकडून आपणास स्वर्गाच्या राजाईचा वारसा घ्यायचा आहे त्याला प्रथम तो जो आहे, जसा आहे ते जाणून घेतले पाहिजे, स्वतःला सुद्धा जाणले पाहिजे, आणि त्याच्याशी संपर्क जोडला पाहिजे. या प्रक्रियेलाच योग म्हणतात. योग म्हणजे जोडणे, मधुर प्रेमपूर्ण मिलन! एक दोहा आहे –

**''आत्मा परमात्मा अलग रहे बहु काल, सुंदर मेला कर दिया जब सद्‌गुरु मिला दलाल''**

(अलग रहे बहु काल म्हणजे वियोग. आत्मा परमात्माचा वियोग! मेला म्हणजे मिलाप अर्थात योग! आत्म्या परमात्म्याचे मधुर मिलन.)

चला आपण आता या योगाचा अर्थात प्रेमपूर्ण मिलनाचा अनुभव घेऊ या. ही एकमेव पद्धती आहे, परमेश्वराकडून सर्व प्राप्ती करण्याची. त्यानंतर मी त्यांना योग विचारधारा द्वारा एका अलौकिक अनुभूतीसाठी मार्गदर्शन केले. संपूर्ण आसमंत सर्वांच्या सकारात्मक तरंगाने भारीत झाला, अवीट गोड शांती पसरली. शब्दात व्यक्त न करता येणारा अनोखा ठेवा घेऊन मंडळी आपापल्या घरी परतली. माझ्या भाषणाचा प्रत्येक शब्द तामीळ भाषेमध्ये सोमेशभाईने भाषांतरीत केला. एकंदरीत कार्यक्रम खूपच चांगला झाला. **सेवेची अशी सुंदर संधी देणाऱ्या परमपिता परमात्मा शिवबाबांना धन्यवाद देत माझे मन गात होते – ''वा, बाबा वा! वा, ड्रामा वा! वा, ईश्वरीय परिवार वा! वा, माझे भाग्य वा!''**

***

---

(पान २५ वरून)

असते. फलस्वरुप तेथे कोणतेही शारीरिक विकार उत्पन्न होत नाहीत. **परमात्मा हा समस्त आत्म्यांचा डॉक्टर असल्याने त्याने मनुष्यात्म्यांना गॅरंटी दिली आहे की, 'ह्या एका अंतिम जन्मात तुम्ही आत्म्याचे विकार नष्ट कराल तर पुढील एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल वीस जन्मांसाठी तुम्हाला कोणताही शारीरिक विकार होणार नाही. अशाप्रकारे परमात्मा शारीरिक विकार निर्माण होण्याचे मूळ कारण कोणते आहे ह्याचे यथार्थ व तर्कशुद्ध ज्ञान देतो.** असा कल्याणकारी व पतितपावन परमात्मा ह्या साकार सृष्टीवर अवतरित झाला असतानाही, बहुतांश मनुष्य हेच सांगतात की, 'तुमच्या विद्यालयात येण्यासाठी आम्हाला वेळ नाही' कदाचित परमात्म्यालाही ह्याचे आश्चर्य वाटत असावे की, मी परमधामाहून सर्वांना पावन बनविण्यासाठी आलो आहे, परंतु आजच्या मनुष्यात्म्यांना मात्र पावन बनण्यासाठी वेळ नाही.

कोणत्याही अस्तिकवाद्याला विशेषतः भक्ताला ही वर्षानुवर्षांची अलौकिक इच्छा असते की, 'मजला सद्‌गुरु एकदा तरी भेटावा.' अशी कल्याणकारी इच्छा मनात ठेवणाऱ्या मनुष्यात्म्यांना अंतिम समयी हे दुःख होऊ नये की, सद्‌गुरुचा सद्‌शिष्य होण्याच्या भाग्याला मी पूर्ण मुकलो आहे! अशा अंतिम व अतीव दुःखातून मुक्त व्हायचे असेल तर सद्‌गुरु परमात्म्याची ब्रह्मामुखाद्वारे उच्चारलेली महावाक्ये श्रवण करण्यासाठी प्रतिदिन ह्या विद्यालयात येणे अपरिहार्य आहे. ह्यालाच दुसऱ्या शब्दात म्हटले जाते 'सब संग तोड, एक परमात्म संग जोडा' परमात्म्याचा हा सत्संग पीस ऑफ माईंड ह्या चॅनलच्या रुपाने घराघरांत पोहचला आहे. त्यावर वारंवार शिव परमात्म्याचे चित्र का दर्शविले जाते हे केवळ परमात्म ज्ञानीच जाणू शकतो. येथील कित्येक ब्रह्मावत्सांच्या मनाची स्थिती हीच झाली आहे की, 'मेरा तो एक शिवबाबा दूसरा न कोई।' अशी ही मनाची स्थिती निरंतर व एकरस होण्यासाठी शिवबाबांची (परमात्म्याची) निरंतर स्मृति येणे आवश्यक आहे. **त्यासाठी त्याचे महावाक्य आहे. 'हे वत्स, देहसहित देहके सभी संबंधोंको भूल, स्वयंको आत्मा निश्चय कर, मुझ एक की ही याद तुम्हे करनी है।' पतित पावन एकमात्र निराकार शिव परमात्मा असल्याने केवळ त्याच्याच स्मृतीमुळे मनुष्यात्मे अल्पावधीत पावन होऊ शकतात. बंधुनो, ज्याप्रमाणे तेल रिफाईंड करण्याचे मशीन असते तद्वतच आत्म्याला रिफाईंड करणारे परमात्मा हे अतिसूक्ष्म व कधीही न बिघडणारे अद्वितीय मशीन आहे. त्यामध्ये कोट्यावधी आत्मे कल्प कल्प पावन होतात.** आत्म्यांना पावन स्थिति प्राप्त करवून देणे, हे तर परमात्म्याचे आद्य व प्रमुख कर्तव्य आहे. आपणही पावन बनण्यासाठी तसेच २१ जन्मांचे दैवी व स्वर्गीय भाग्य प्राप्त करण्यासाठी ब्रह्माकुमारी विद्यालयात अवश्य यावे. असे समस्त ब्रह्मावत्सांतर्फे आग्रहाचे आमंत्रण देऊन, सदरहू लेखाला विराम देतो.

***



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# शंखध्वनी

**ब्र. कु. नीता बहन, बोरिवली (प.)**

मंदिराचे पवित्र वातावरण, अगरबत्तीचा मनमोहक सुगंध, लोभस वाटणारी देवतेची मूर्ती, प्रभु प्रेमात रंगून जाणारे भक्तगण, सुमधुर आवाजात गायले जाणारे प्रभुप्रितीचे गीत, नयनरम्य दृश्य बघत असतानाच कानावर पडणारा शंखध्वनी आपल्याला मनाच्या खोल गाभाऱ्यात घेऊन जातो. मन कसं प्रसन्नतेने भरुन जाते. याउलट रणभूमीवर वाजणारा शंखध्वनी आठवताच, मनामध्ये महाभारतात वर्णित कुरुक्षेत्राची रणभूमी, डोळ्यासमोर उभी रहाते. मन भीतीने ग्रस्त होते. अंगावर काटा उभा रहातो. तात्पर्य म्हणजे मंदिरामध्ये वाजणारा शंख आणि रणभूमीवर वाजणारा शंख, ह्या दोघांमध्ये कमालीचे अंतर आहे.

महाभारतात ह्या शंखध्वनीचे वर्णन अतिशय सुंदर शब्दात केले आहे. कौरव व पांडव ह्या आपल्या मनाच्याच दोन वेगळ्या अवस्थांचे प्रतीक आहे. महाभारतातील युद्ध हे हिंसक नसून, ते आपल्या मनात चालणाऱ्या चांगल्या व वाईट विचारांच्या वेगवेगळ्या अवस्थांचे चित्रीकरण आहे. गीतेमध्ये श्रीकृष्ण हे निराकार शिव भगवंताचे प्रतीक आहेत व त्यांच्या श्रीमतावर चालणारे पांडव हे प्रीतबुध्दी आत्म्यांचे प्रतीक आहे. याउलट कौरव हे विपरीत बुद्धी आत्म्यांचे प्रतीक आहे. **वास्तविक संगमयुगात निराकार शिव परमात्म्याने या सृष्टीरुपी कुरुक्षेत्रावर प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीररुपी रथात बसून, माया अर्थात मनोविकारांशी लढण्यासाठी ईश्वरीय ज्ञान दिले होते. परंतु शास्त्रकारांनी नंतर अलंकारिक भाषेत याचे वर्णन केले आहे. महाभारत युद्धात वाजविलेले शंख कसे अलंकारिक भाषेत वर्णित होते, हे आपण थोडक्यात पाहू या.**

महाभारत युद्धात श्रीकृष्णांनी 'पंचजन्य' शंखाचा ध्वनी केला, असे वर्णन आहे. वास्तविक संगमयुगात निराकार शिव परमात्मा शंखध्वनी करतात. अर्थात सत्य गीता ज्ञान ऐकवण्यासाठी ब्रह्मामुखाचा आधार घेतात. तो आहे 'पंचजन्य शंख'. याचा अर्थ असा आहे की पंच ज्ञानेंद्रियांचे रस (शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध) ह्यांच्यापासून अलिप्त होऊन, स्वरुपामध्ये टिकण्यासाठी हा शंख ध्वनी केला जातो. आता शिव परमात्म्याने आपल्याला स्वतःची तसेच आपल्या आत्म्याची ओळख करुन दिली आहे. आजवर आपण स्वतःला शरीर समजून, देह अभिमानवश मनोविकारांच्या अधीन होत होतो. परंतु ज्ञानाद्वारे जीवनाचे सत्य उलगडले आहे. त्यानुसार आपल्या भावनांमध्ये परिवर्तन झाले आहे. फलस्वरुप शरीर व त्याच्या सर्व विस्ताराला समेटून, आत्मस्वरुपावर आपले ध्यान कसे एकाग्र करावे, याची पूर्ण समज ईश्वराच्या पंचजन्य शंखध्वनीने आली आहे.

गीतेमध्ये या सृष्टीला 'धर्मक्षेत्र' व 'कर्मक्षेत्र' असे म्हटले आहे. बाह्य विश्वामध्ये खूप काही घडत आहे. परंतु आपल्याला आंतरिक विश्वात चालणाऱ्या युद्धात विजय मिळवायचा आहे. त्यासाठी युधिष्ठिर अर्थात युद्धात स्थिर राहणारा. त्यांनी 'अनंत विजय' नावाचा शंख वाजवला. परमात्मा शिव पिता आपल्याला श्रीमत देतात की अमृतवेळेला उठून श्रेष्ठ स्मृतीचा 'स्वीच ऑन' करा आणि दिवसभर येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीवर मात करून, विजयाचा अनुभव करा. त्यासाठी तीन स्मृतींचा तिलक लावा. १) मी आत्मा बिंदी, २) परमात्मा बिंदी, ३) ड्रामा बिंदी. मी कल्प-कल्प विजयी आत्मा आहे. ह्या स्वमानाची स्मृती जर निरंतर असेल तर 'विजयी भव' चे वरदान सहजच प्राप्त होते. अशाप्रकारे मनोविकारांशी चालणाऱ्या युद्धामध्ये आपला विजय निश्चित असल्याचा शंखध्वनी युधिष्ठिर करतो.

महाभारत युद्धात भीमाने 'पौंडू



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18

अर्थात प्रीती' नावाच्या शंखाचा ध्वनी केला. 'प्रीतबुद्धी विजयन्ति' आणि 'संशय बुद्धी विनश्यन्ति असे म्हटले जाते. ईश्वरावर असलेला दृढविश्वास आपल्याला प्रत्येक परिस्थितीतून सहज पार करतो. प्रीतीचा उगम हृदयातून होतो व ईश्वराच्या प्रेमाने भरलेले हृदय, जीवनातील प्रत्येक समस्येतून अलगद बाहेर काढते. संत मीराबाईच्या हृदयात ईश्वराविषयी असलेल्या नितांत प्रेमामुळे, विषाचा प्याला सुद्धा अमृतमय बनला.

अर्जुनाने 'देवदत्त' नावाचा शंखध्वनी केला. अर्जुन अर्थात ज्ञान अर्जन करणारा. ईश्वरीय ज्ञानाद्वारेच आपल्याला शाश्वत व अशाश्वत (नश्वर) यातला भेद समजतो. ईश्वरीय ज्ञानाच्या धारणेनेच मानव देवता बनतो. अशाप्रकारे अर्जुन अर्थात ईश्वरावर अतूट श्रद्धा असणारा, प्रत्येक कर्म श्रीमतानुसार करणारा, फलस्वरुप भविष्यात उच्चतम देवता पद प्राप्त करणारा होय.

नकुल ह्याने 'सुघोष' नावाचा शंखध्वनी केला. सुघोष अर्थात ईश्वरीय नियमांचे पालन करुन, आपल्या जीवनातील अशुभाचे शमन आणि शुभाचे अस्तित्व निर्माण करणे होय. आपले जीवन जर सुखी समाधानी रहावेसे वाटत असेल तर आध्यात्मिक नियमांची जागरुकता असणे आवश्यक आहे. कारण नियमांचे पालन करणारी व्यक्ती नेहमीच सुरक्षित रहाते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ईश्वरीय श्रीमतानुसार केलेले प्रत्येक कर्म. हे सुकर्म बनते. त्याचबरोबर ईश्वरीय नियम अथवा मर्यादा यांचे पालन केल्याने आपण सदैव ईश्वरीय छत्रछायेत सुरक्षित रहातो. याउलट ईश्वरीय मर्यादांचे उल्लंघन केल्यास पश्चाताप करायची वेळ येते. जसे रामायणामध्ये सीतेला लक्ष्मणरेषा आखून दिली होती. ज्यामध्ये ती सुरक्षित होती. रावणसुद्धा त्या रेषेला ओलांडू शकत नव्हता. परंतु जेव्हा ती रेषा पार करून सीता बाहेर येते तेव्हा रावण सीतेचे हरण करतो. त्यामुळे ईश्वरीय मर्यादायुक्त जीवन जगणे, सर्वाधिक सुरक्षित तसेच खूपच फायद्याचे होय.

महाभारत युद्धात सहदेवाने 'मणिपुष्पक' नावाचा शंख वाजवला, असे दर्शविण्यात आले आहे. आपण हे जाणतो की ज्ञानमार्गात आपला एक एक संकल्प एखाद्या मणीप्रमाणे मूल्यवान आहे. प्रत्येक कर्माची सुरुवात संकल्पाद्वारे होते. तात्पर्य म्हणजे आपला प्रत्येक संकल्प जर मणीप्रमाणे मूल्यवान असेल तर त्यापासून प्राप्त होणारी सफलता आपल्याला भविष्यात पुष्पक (अर्थात कुबेराचं विमान) सुद्धा प्राप्त करून देईल. अशाप्रकारे आपला प्रत्येक संकल्प श्रेष्ठ बनविण्यासाठी नियमित सत्संग (सत्य परमात्म्याचा संग) करणे आवश्यक आहे. म्हणूनच ज्ञानमार्गात रोज ईश्वरीय ज्ञान मुरलीचे वाचन वा श्रवण आवश्यक आहे. संकल्पांचे परिवर्तन हेच खरे जीवनाचे परिवर्तन आहे.

वरील विवेचनावरून आपल्या हे लक्षात आले असेल की महाभारतातील वर्णन हे महर्षी व्यासांनी अलंकारिक भाषेत केले आहे. वास्तविक वर्तमान संगम युगात शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्माच्या शरीररुपी रथात अवतरित होऊन ज्ञान देतात. व त्याद्वारे सत्यधर्माची स्थापना होते. त्यानंतर कलियुगी सुष्टीचा महाभारी विनाश होतो आणि सत्ययुगाची स्थापना होते. परंतु या सर्व महान परिवर्तनानंतर हे रहस्य प्रायः लुप्त होते. नंतर जेव्हा द्वापरयुगात महाभारत लिहिले गेले तेव्हा फार पूर्वी म्हणजे संगमयुगात होऊन गेलेल्या या वृत्तांताचे रुपांतर वर्तमान काळाचा उपयोग करुन, अलंकारित भाषेत केले गेले. त्यामुळे कालांतराने लोकांनी गीता - ज्ञानही महर्षी व्यासांच्या हयातीत म्हणजे द्वापरयुगात दिले गेलेले ज्ञान मानले. परंतु आता आपल्या लक्षात आले की, गीता ज्ञान हे श्रीकृष्णाचा पारलौकिक पिता, सर्व धर्माच्या अनुयायांचाही परमपूज्य पतितपावन, सर्वांचा सद्‌गतिदाता तसेच स्वर्गीय राज्यभाग्य देणारा, निराकार शिव परमात्मा आता देत आहेत. या ज्ञानाद्वारेच आपण मनोयुद्धामध्ये सहजच विजय प्राप्त करू शकतो. ***

**जितके जितके आपण पुरुषार्थात पुढे जाऊ तितके आपल्याला बोलण्याची गरज पडणार नाही. आपला चेहराच बोलेल की यांना सारे काही प्राप्त आहे. कारण चेहरा हाच दर्पण असतो. आपला चेहराच सेवा करेल. पुढे समय नाजूक होत जाईल तसेच इतक्या लोकांना ज्ञान समजावून सांगायला वेळही नसेल. अशावेळी आपले चैतन्य चित्र सेवेसाठी निमित्त बनेल.**

**आ. दादी गुलजारजी**


D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18



# जीवनाला 'यू टर्न' दिला शिवबाबांनी ...

**बी. के. रामदास देशमुख, मालेगाव कॅम्प (रावळगांव)**

मी ज्ञानमार्गामध्ये येण्याअगोदर माझा स्वभाव अतिशय तापट, क्रोधी व रागीट होता. घरात सर्व भावंडात लहान असल्यामुळे अति लाडाकोडाने माझा स्वभाव हट्टी झालेला होता. लहानपणापासूनच मला शाकाहारी भोजन खाणे माहितच नव्हते. मी संपूर्ण मांसाहारीच होतो. रोज अंडी, मटण, चिकन, मासे, खेकडे, सोडे... हाच माझा आहार होता. लहानपणापासूनच शाळेसोबत नियमीत तालमीमध्ये जाणे, कुस्ती खेळणे ह्याची सवय व आवड सुद्धा होती. कुस्तीमध्ये मी पारंगत होतो. १९८९ ला पुणे विद्यापीठाची (६२ किलो मध्ये) चॅम्पीयनशीप मला मिळाली होती. आहार आणि व्यायामाने मिळविलेल्या ताकदीचा उपयोग मी दादागिरी व मारामारी करणे या साठीच वापरत होतो. शाळेमध्ये व नंतर कॉलेजमध्ये पण अभ्यासापेक्षा दादागिरी व मारामाऱ्या करणे हाच उद्योग चालू होता. कॉलेजमध्ये सरांना मारण्यापर्यंत मजल गेली. जिथे पाय ठेवेल तिथे फक्त दहशत निर्माण करत होतो. मारामाऱ्या करताना समोरचा मरतो की जगतो तेही बघत नव्हतो.

माझ्या या स्वभावामुळे मोठ्या भावाने मला दुसऱ्या शहरातील कॉलेजमध्ये टाकले. मी कराडवरून साताऱ्याला आलो. त्यानंतर २ वर्षात वडीलांनी शरीर सोडले व पूर्णतः बिघडलो. माझ्या मोठ्या भावाने अतिशय कष्टाने मला MSC पर्यत शिकवले. त्यानंतर मला नाशिक जिल्ह्यातील रावळगांव शुगर फॅक्टरीमध्ये नोकरी मिळाली व नंतर लग्न झाले. सुदैवाने युगल अतिशय सुसंस्कारी, शांत व सहनशील मिळाली. संसारवेलीवर छान दोन फुलं आली. त्यानंतर आईने पण शरीर सोडले व दरम्यानच्या काळात मला गुटखा, तंबाखू, दारू सर्व प्रकारची व्यसने लागली. जोडीला रोजचा मांसाहार होताच त्यामुळे कमाईतला मोठा भाग व्यसनावर व मांसाहारावर खर्च होत असे. घरात चणचण भासू लागली. तरीसुद्धा माझ्या व्यसनामध्ये दिवसेंदिवस वाढच होत गेली. दारू पिणे, दारूच्या पार्टी देणे, पैसा उधळणे या गोष्टी नेहमीच्याच झाल्या. घरातील मुलांची काहीही काळजी नव्हती.

रात्रीचा दारू पिणारा मी वेळेचे बंधन सोडून कधीही दारू पिऊ लागलो. डॉक्टरांनी अनेक वेळा गुटखा बंद करण्यास सांगूनही, गुटखा खाण्याचे प्रमाण वाढत गेले. घरात सतत तणावाचे वातावरण असे. मुले, पत्नी सतत दबावात वावरत असत. रात्री दारू पिऊन आल्यानंतर कधी कधी जेवणाचे वाढलेले ताट, किरकोळ कारण काढून सरळ भिंतीवर फेकून देत असे. मला क्रोध आल्यानंतर त्याचे स्वरूप इतके भयानक असे की घरच्यांना समोर मृत्यूच दिसे. माझा क्रोध म्हणजे टांगती तलवार होती. घरातील कोणावर वार होईल याचा नेम नाही. मुलगा सुद्धा वडील मारतील म्हणून खूप घाबरत असे आणि देवाला प्रार्थना करत असे की देवा, तू माझ्या वडिलांचा क्रोध शांत कर.

परंतु खरोखरच शिवबाबांची कृपा झाली. २३ डिसेंबर २०११ रोजी अचानक माझ्या ९ वर्षाच्या मुलाला खूप जास्त ताप आला आणि आमचे नेहमीचे डॉक्टर रावळगाव मध्ये आयोजित ब्रह्माकुमारीच्या ७ दिवसाच्या कोर्सला गेलेले होते व योगायोगाने मी त्यांना बोलविण्यासाठी तेथे पोहोचलो. पाहतो तर तिथे मालेगाव वरून आलेल्या ब्र.कु. ममतादीदी, आत्मा – परमात्मा यांचा परिचय देत होत्या. मी तेथेच बसून पूर्ण कार्यक्रम ऐकला. तेव्हा मला वाटले की आपण इतके शिक्षण घेतले पण हे सुंदर सत्य ज्ञान कधीच ऐकले नाही. उद्यापासून कोर्सला नियमित येण्याचे ठरवून मी डॉक्टरांना घेवून घरी गेलो. आश्चर्य म्हणजे माझ्या मुलाचा ताप पूर्णपणे गायब झाला होता. अशा प्रकारे बाबांनी मला ज्ञानात आणले.

ईश्वरी शक्तीची मला प्रचिती झाली होती.

१ जानेवारी २०१२ ला मालेगावच्या सेंटर वर जाण्याची सुर्वणसंधी मला मिळाली. सेंटरवरचे शांत व पवित्र वातावरण आणि बी. के शकुदीदी, ममतादीदीचे स्नेहपूर्वक वागण, ह्या गोष्टींमुळे मी अगदी भारावून गेलो. मनाला शांत आनंदी वाटत असताना मनात एक खंत ही निर्माण होत होती की इतक्या पवित्र ठिकाणी उभे राहण्याची माझी लायकी तरी आहे का? कारण ही तसेच होते त्यावेळी माझ्या खिशात ८-१० गुटख्याच्या पुड्या होत्या. सेंटर मधून बाहेर आल्यानंतर त्या गुटखाच्या पुड्या मी फेकून दिल्या आणि परत कधीच गुटखा न खाण्याची प्रतिज्ञा केली. गेल्या साडेपाच वर्षात गुटखा तर खाल्लाच नाही पण गुटखा खाणाऱ्याशी मी बोलतही नाही. हाच माझा बाबांचा मुलगा बनल्यानंतर पहिला अनुभव. त्यानंतरचे जीवन ही बाबांनी दिलेल्या अनुभवांची साखळीच बनत गेली.

कोर्स पूर्ण झाल्यानंतर रावळगांवला गीता पाठशाला सुरु झाली. रोज बाबांची मुरली ऐकू लागलो आणि बाबांच्या एका - एका महावाक्यातून जीवनाचा खरा अर्थ कळू लागला. त्याचच मधुबनला जाण्याची सुवर्णसंधी लाभली. मे २०१२ ला होणाऱ्या ग्रामविकास प्रोग्रॅमला दीदींनी मला पाठविण्याचे ठरविले. ठरल्याप्रमाणे मी सहकुटुंब मधुबन शांतिवनला पोहोचलो. त्या भूमीवर पाय ठेवता क्षणी वाटू लागले की आपण अगदी वेगळ्याच दुनियेत आलो आहोत. त्यानंतर ४ दिवस ज्ञानसरोवरला राहण्याची संधी मिळाली कारण कार्यक्रम ज्ञानसरोवरलाच होता. तेथील स्वच्छता, शांतता, शिस्त, स्नेह सगळंच अवर्णनीय आहे. त्या ४ दिवसात मलाच माझ्यामध्ये खूपच परिर्वतन जाणवत होते. नंतर पांडव भवनला जावून आलो, एका अदृश्य शक्तीची सतत जाणीव होऊ लागली. बाबा सतत माझ्या सोबत होते. ४ दिवसाच्या योगाने मन खूपच शांत आणि शक्तिशाली बनले. सर्व वाईट सवयी बाबांना देण्याचा पक्का निश्चय केला. तेथून निघतांना बाबांच्या कमऱ्यात जावून, सर्व वाईट गोष्टी तिथेच ठेवून आलो. जसे की सर्व प्रकारचा मांसाहार, दारू, तंबाखू, कांदा, लसून इत्यादी. एका झटक्यात इतक्या गोष्टी सोडणे बाबांमुळे शक्य झाले. बघा, माझ्या सारख्या असुराला सुद्धा शिवबाबा देवता बनवितात. सध्या मी रावळगांव शुगर फॅक्टरीमध्ये मॅनेजर या पदावर आहे.

योगी जीवनाची आता गोडी लागली. आपले जीवन जसे परिवर्तन झाले तसेच इतरांचे ही व्हावे असे वाटू लागले. त्यामुळे मी युगलसह जास्तीत जास्त लोकांना बाबांचा परिचय देत असतो. आज रावळगांव मध्ये तीन गीता पाठशाळा चालू आहेत. बाबांनी एका चांगल्या कामासाठी आपल्याला निमित्त बनविले; ह्याचा खूपच आनंद होतो. माझ्या घरच्यांच्या आनंदाला तर पारावार नाही. त्यांच्यासाठी घरच स्वर्ग बनले. माझ्या क्रोधाग्निमुळे आजवर ते मला नुसते घाबरत असत. आता घरात प्रेमाची गंगा वाहते आहे. खरोखर शिवबाबांची ही सारी किमया! त्यांच्यामुळेच माझ्या जीवनाला 'यु टर्न' मिळाला. म्हणूनच मन सदैव हेच गीत गात असते -

**''बाबा आपने कमाल कर दिया,**
**हमारा सारा जीवन आपने,**
**खुशहाल कर दिया''**

***

**ब्रह्मावत्सांच्या जीवनाचा जन्मसिद्ध अधिकार खुशी आहे. खुशी हा शिवबाबांचा खजिना आहे. बापाच्या खजिन्यावर मुलांचा जन्मसिद्ध अधिकार असतो. त्यामुळे खुशीचा खजिना हा आपला खजिना आहे. तसेच तो अविनाशी पित्याकडून मिळाला आहे. म्हणूनच या अविनाशी खजिन्याचा नशा देखील अविनाशी ठेवा.**

**आजच्या या दुनियेत कुणाजवळ खुशी नाही. काळा पैसा आहे परंतु खुशी नाही. खुशीच्या खजिन्याने सर्व जण गरीब आहेत. आपण ब्रह्मावत्स मात्र खुशीच्या खजिन्याने भरपूर आहोत. हा खुशीचा खजिना आपल्याबरोबर संपूर्ण कल्पात रहाणार आहे. आपली जड चित्रे देखील भक्तांना खुशी देतील. त्यामुळे चेक करा की इतका खुशीचा खजिना जमा केला आहे का?**

**- आदरणीय दादी जानकीजी**



D:\YEAR 2018\Amrutkumbha 14 size * 30-1-18